# प्रकरण चौथे

## वस्तीगृहाचे व्यवस्थापन, अर्थव्यवस्था, शिष्यवृत्ती, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम

# प्रकरण चौथे

# वसतिगृहाचे व्यवस्थापन, अर्थव्यवस्था, शिष्यवृत्ती सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम

**वसतिगृहाचे व्यवस्थापन :**

द भारत जैन सभेने कोल्हापूर बोर्डिंगची सुरुवात १९०५ मध्ये केली. त्यानंतर दिगंबर जैन बोर्डिंग हुबळी (१९०९), माणिक बाग दिगंबर जैन बोर्डिंग बेळगाव (१९१५), रा. ध. दावडा दिगंबर जैन बोर्डिंग सांगली (१९२२), दिगंबर जैन बोर्डिंग इचलकरंजी (१९८६) अशी विद्यार्थी वस्तीगृहाची एक मालिकाच २० व्या शतकात सुरू केली. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षण देण्याची गरज ओळखून महिलाश्रम काढण्याची अभिनव योजना द. भा. जैन सभेने १९०८ पासून सुरू केली. या महिलाश्रमाच्या मालिकेत जैन श्राविकाश्रम कोल्हापूर (१९०८), श्रीमंतबाई कळंत्रे श्राविकाश्रम सांगली (१९२२), स्व. सौ. सुमनबाई सदलगे जैन श्राविकाश्रम कागल (२०००) या वस्तीगृहाची सुरुवात केलेली होती. कोल्हापूर येथे पहिले दिगंबर जैन बोर्डिंग १९०५ मध्ये स्थापन झाले. त्यावेळी छ. शाहू महाराजांनी या बोर्डिंगकरिता संस्थानची दुसऱ्या चौकातील जागा मोफत देऊ केली होती. तसेच वार्षिक फंडही या बोर्डिंगला संस्थानाकडून देऊ केला होता. कोल्हापूरमध्ये १९०१-१९२२ या कालखंडात सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची सुरुवात झाली. पण ही वसतिगृहे त्या त्या धर्माच्या व जातीच्या व्यवस्थापनाखाली होती. कोल्हापूर संस्थान विलीन होईपर्यंत या सर्व बोर्डिंगच्या खर्चासाठी संस्थानकडून काही प्रमाणात फंड दिले जात असत. संस्थान विलिनीकरणानंतर (१९४९) ही सर्व वस्तीगृहे त्या त्या जाती-धर्माच्या ट्रस्टींच्या अधिपत्याखाली आली. कोल्हापूर दिगंबर जैन बोर्डिंग मात्र कोल्हापुरातील स्थानिक जैन कार्यकर्त्यांच्या व्यवस्थापनाखाली राहिले तरीही ते १९०५ पासूनच दक्षिण भारत जैन सभेच्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

व्यवस्थापनाचा एक भाग होता. त्यामुळे २० व्या शतकात सुरू केलेली विद्यार्थी व महिला वस्तीगृहे ही सर्व द. भा. जैन सभेच्या मध्यवर्ती कमेटीच्या व्यवस्थापनाखाली राहिली.[१]

दक्षिण भारत जैन सभेचे घटनेप्रमाणे सभेचे अध्यक्ष हे सर्व कामकाजाला जबाबदार असतात. त्यांची निवड दर पाच वर्षांनी केली जाते. त्यांच्या अंतर्गत संस्थेच्या सर्व समित्या व शाखा कार्य करतात. द. भा. जैन सभेचे दुसरे महत्वाचे पद हे उपाध्यक्ष आहे. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत व इतर वेळेला ही विभागीय मंडळाचे ते कार्याध्यक्ष म्हणून काम करतात. संस्थेचे चेअरमन हे द. भा. जैन सभेतील अतिशय महत्वाचे पद आहे.कारण मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या सर्व बैठका चेअरमन यांच्याच अध्यक्षतेखाली भरतात. संस्थेसाठी निधी गोळा करणे. घटनेची अंमलबजावणी करणे वगैरे अधिकार आणि कर्तव्ये चेअरमन बजावतात. चेअरमन हे पद दक्षिण भारत जैन सभेच्या अनेक वर्ष कार्य करीत असलेल्या व्यक्तीलाच निवडले जातात. त्यांच्या गैरहजेरीत व्हा. चेअरमन हे संस्थेच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडतात.

सभेच्या सर्व शाखांचे आर्थिक व्यवहार द. भा. जैन सभेचे मुख्य खजिनदार करतात. आर्थिक व्यवहाराची कामे लक्ष घालून संस्था व शाखेची आर्थिक बजेट त्या त्या पदाधिकाऱ्याकडून करून घेऊन ती मध्यवर्ती कार्यकारी मंडळाकडून मंजूर करून घेतली जातात. त्यासाठी संस्था व संस्थेच्या शाखा योग्य बाबीवर खर्च करतात की नाही हे पाहण्याची जबाबदारी खजिनदार करतात. त्यामुळे सभेची सर्व वस्तीगृहे व महिलाश्रम हे आर्थिक व्यवस्थापनासाठी द. भा. जैन सभेचे खजिनदार यांच्या नियंत्रणाखाली येते.[२]

यानंतरचे पद मुख्य महामंत्र्याचे असते. त्यांच्या ताब्यात संस्थानच्या सर्व शाखा म्हणजे पर्यायाने वस्तीगृह व महिलाश्रम यांचे कागदपत्रात येतात. अधिवेशनात व मध्यवर्ती कार्यकारी मंडळात वेळोवेळी केलेल्या ठरावांची अंमलबजावणी मुख्य महामंत्री करतात. संस्थेतर्फे कार्यवृत्त लिहिणे, जमाखर्च ठेवणे, पत्रव्यवहार करणे, दावे करणे, कोर्टात हजर

राहणे संस्थेतर्फे प्रचार भाषणे शिबिरे चर्चासत्रे, यावर नियंत्रण ठेवतात. स्कॉलरशीप वाटणे आणि वस्तीगृहाचे अहवाल जमा खर्च बजेट कार्यकारी मंडळ, मध्यवर्ती कमेटीकडे सादर करण्याची कामे मुख्य महामंत्र्यांना करावी लागतात. सभेचे कार्यक्षेत्र विस्तारीत झाल्यानंतर महाराष्ट्र, औरंगाबाद, पुणे या ठिकाणी व्यवस्थापन करणे गरजेचे बनते. त्यामुळे ३ व ४ जून १९९५ मधील इचलकरंजी येथील अमृत महोत्सवी अधिवेशनात विभागीय मंडळे स्थापन करून त्यावर प्रत्येकी एक महामंत्री नेमण्यात आला. हे सर्व महामंत्री आपापल्या क्षेत्रातील वसतिगृहाचे त्या त्या वस्तीगृहाच्या अधीक्षकाच्या सहाय्याने व्यवस्थापन करतात. त्यांच्या कार्यावर मुख्य महामंत्री व चेअरमन नियंत्रण ठेवतात.३

## वसतिगृहाचे अधीक्षक :

प्रत्येक वस्तीगृहाचे अधीक्षक हे त्या वस्तीगृहाच्या दैनंदिन कामकाजावर लक्ष ठेवतात. तसेच मध्यवर्ती कमिटीकडून येणाऱ्या सूचनांचे पालन करून त्याप्रमाणे वस्तीगृहाचे व्यवस्थापन करतात.

## सुपरिटेंडेंटचे काम

१) विद्यार्थ्यांमध्ये शिस्त निर्माण करणे.

२) वस्तीगृहाचे दैनंदिन ऑफिस काम पाहणे.

३) विद्यार्थ्यांचे दैनंदिन प्रश्न सोडवणे.

४) वस्तीगृहाचे आर्थिक व्यवहार सांभाळणे.

५) पत्रव्यवहार पाहणे.

६) द. भा. जैन सभेचे विविध कार्यक्रम व त्यांचे नियोजन आपल्या वस्तीगृहात करणे.

७) इमारती, इमारतीचे व्यवस्थापन सांभाळणे.[४]

द. भा. जैन सभेच्या वस्तीगृहांना प्रत्येक वस्तीगृह व महिलाश्रमांना चेअरमन सेक्रेटरी व सुपरिटेंडेट ही पदे असतात. चेअरमन व सेक्रेटरी हे त्या त्या ठिकाणच्या स्थानिक

कार्यकर्त्यांच्या कमिटीतून निवडलेले असतात. तर सुपरिटेंडेंट हे कायमस्वरूपी वस्तीगृहात राहणारे असतात.[५] बहुतेक सर्व बोर्डिंगचे सुपरिटेंडेट हे शिक्षण क्षेत्रात निवडले गेले आहेत. कोल्हापूर बोर्डिंग हे सर्वात पहिले व दक्षिण भारत जैन सभेचे महत्वाचे केंद्र असल्याने मान्यवर लोक; कर्तृत्ववान लोक येथून अधीक्षक म्हणून निवडले गेले. उदा. दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूरचे अधिक्षक श्री. आण्णासाहेब लट्ठे (१९०५-१४), प्रो. शामराव वणकुंद्रे (१९३४-३७), डॉ. ए. एन. उपाध्ये (१९४६-४८), तात्यासो पाटील (१९६६-६८), प्राचार्य डॉ. जी. के. पाटील (१९७६-७७), श्री. श्यामकांत पाटील (१९७९-८१), प्रा. डी. ए. पाटील (१९८६-१९९७) हे सर्वच अधीक्षक द. भा. जैन सभेचे मान्यवर कार्यकर्ते असल्याने या वस्तीगृहाची वाढ आणि विकास जलद गतीने झाला. कोल्हापुरातील छत्रपती शाहूंनी सुरू केलेल्या मराठा बोर्डिंग आणि द. भा. जैन सभेचे दि. जैन बोर्डिंग शंभरी पूर्ण केलेली ही वस्तीगृहे आहेत. २००५-०६ हे या बोर्डिंगचे शताब्दी वर्ष म्हणून विविध कार्यक्रमांनी साजरे केले जात आहे.[६]

आण्णासाहेब लट्ठे येथील अधीक्षक असताना कर्मवीर भाऊराव पाटील येथील विद्यार्थी होते. १९०९ साली मिस क्लार्क या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बोर्डिंगची स्थापना दि. जैन बोर्डिंगच्या चतुराबाई हॉलमध्ये झाली.[७] वसतिगृहाच्या व सत्यशोधक चळवळीत छ. शाहूंना मदत करणारे भास्करराव जाधव, महादेव डोंगरे, यांच्या बऱ्याच मिटिंग्ज याच वस्तीगृहात होत होते. छ. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य पुढे नेण्याचे या वसतिगृहाच्या सुरुवातीचा कालखंड हा आर्थिक विवंचनाचा होता. त्यामुळे शिक्षण फंड गोळा करण्याचे काम सुप. लट्ठे, रा. सा. चौगुले, श्री. बुगटे, श्री. लेंगडे इ. मंडळी करत. नोव्हेंबर १९०८ मध्ये गळतगा, बेडकिहाळ, सदलगा, शमनेवाडी येथील दानशूर लोकांकडून १०० रु. शिक्षण फंड; कार्यकर्त्यांनी गोळा केला. या प्रवासात हे कार्यकर्ते शिक्षण प्रसाराविषयी कर्नाटक व

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सामान्य लोकांत भाषणे देत. त्यामुळे त्या भागातून विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फंड गोळा केले जाई.

दक्षिण भारत जैन सभेच्या कार्यकर्त्यांबरोबर वसतिगृहातले विद्यार्थी हे स्वत:साठी व इतर विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्यासाठी सुट्टीच्या दिवसात ठिकठिकाणी जाऊन धान्यफंड व द्रव्यफंड जमा करत. तसेच वसतिगृहाच्या इमारती बांधण्यामध्ये गरीब विद्यार्थी मदत करून आपल्या शिक्षणाचा खर्च भागवित. 'कमवा व शिका' योजनेची कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेत सुरू केलेली ही मोहीम या काळातच अंवलंबिली होती.[८]

१९०८ मध्ये जंबू मारुती करांडे-वाटेगावकर व भाऊ पायगोंडा पाटील-ऐतवडेकर यांनी दिपावलीच्या सुट्टीत मौजे वाटेगाव वाळवे, बुरली आष्टा, डिग्रज, ऐतवडे वगैरे ठिकाणी प्रवास करून या गावातील लोकांना एकत्र जमवून सभा केल्या. जैन धर्माची माहिती सद्यस्थिती व शिक्षण प्रसारासाठी शिक्षण फंडाची आवश्यकता या विषयावर भाषणे करून लोकांकडून ७० रुपये जमवले. कित्येक दानी लोकांकडून पैशाचा वचन फंडही मिळवला. वस्तीगृहाचे विद्यार्थी अशा प्रकारे प्रत्येक गावी गेल्याने वस्तीगृहास आर्थिक मदत तर मिळतेच पण त्यांच्यामध्ये सभाधिटपणा येऊन सार्वजनिक काम करण्याची इच्छा निर्माण होते.[९] हे काम आपापल्या भागात सर्व वस्तीगृहाचे विद्यार्थी करीत.

कर्मवीर भाऊराव पाटील हे या बोर्डिंगचे पहिल्या दहा वर्षातील विद्यार्थी त्यांनी अशा प्रकारे धान्यफंड, मुष्टिफंड व शिक्षण फंडासाठी सर्व ग्रामीण भागात पायपीट करून शिक्षणाकरिता पैसे जमा केल्याने त्यांच्या मनामध्ये स्त्री शिक्षणाची दूरवस्था लोकांचे जीवन याबद्दल मनामध्ये काही प्रश्न निर्माण झाले. कोल्हापूर जैन बोर्डिंगमधील शिक्षण अर्धवट सोडून किर्लोस्कर कंपनीच्या वितरक म्हणून गावोगावी हिंडत असताना हाच प्रश्न त्यांच्यापुढे उभा होता म्हणूनच १९१९ ला सत्यशोधक समाजाच्या काले येथील अधिवेशनात रयत शिक्षण संस्थेची स्थापना त्यांनी केली. १९२४ ला सर्वधर्मीय विद्यार्थ्यांसाठी सातारा येथे

वस्तीगृह चालू केले. आज रयत शिक्षण संस्था महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागात ज्ञानदान करणारी प्रथितयश संस्था आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांना या शिक्षणविषयक विचारांचे व कृतीचे ज्ञान छ. शाहूंच्या सानिध्यात व द. भा. जैन सभेच्या बोर्डिंग हाऊसमध्ये मिळाली. हे नाकारता येत नाही.

## १) वस्तीगृहासंबंधीच्या मासिक बैठका

वस्तीगृह व्यवस्थापनामध्ये जवळ जवळ तीस सभासद असतात. या तीस सभासदांची एकत्र बैठक (मिटिंग) महिन्यातून एकदा भरते. या मासिक बैठकीवेळी विद्यार्थ्यांचा देखील समावेश करून घेतला जातो. या मासिक बैठकीवेळी बोर्डिंग व्यवस्थापनात काही त्रुटी असल्यास त्या जाणून विद्यार्थ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांना बोर्डिंगमध्ये कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याची दक्षता घेतली जाते. विद्यार्थ्यांसाठी कोणकोणते नवनवीन उपक्रम सुरू करता येईल याची चर्चा केली जाते. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना 'कमवा व शिका' या योजनेचा लाभ कसा घेता येईल याची दक्षता घेतली जाते. यामुळे बोर्डिंगमध्ये विद्यार्थ्यांना इतर काही सुविधा त्यांच्या मागणीनुसार उपलब्ध करून देता येतील काय हे जाणून घेतले जाते. तसेच बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा विनिमय करून बोर्डिंगमधील त्रुटीबद्दल त्यांच्याकडून जाणून घेण्याचे काम व्यवथापन करते. तसेच काही त्रुटी पूर्ण करण्यात व्यवस्थापन मंडळ एकमताने पूर्णपणे प्रयत्न करणे.

या सर्व गोष्टींचा व्यवस्थापन मंडळाच्या मासिक बैठकीमध्ये प्रत्येक वसतिगृहात आढावा घेतला जातो.[१०]

## २) शिस्त आणि शिस्तविषयक नियम

१) बोर्डिंगमधील विद्यार्थी सुसंस्कारित रहावेत वक्तशीरपणा यावा, धार्मिक शिक्षण व्हावे या हेतूने दररोज पहाटे ५.३० वा. प्रार्थना घेतली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आचरण, स्वभावगुण चांगले होण्यास मदत होते.

२) रात्री १० ते ११ च्या दरम्यान सर्व बोर्डिंगच्या आवारातून व विद्यार्थ्यांच्या खोलीजवळून रोज अधिक्षक फेरी मारतात. जेणेकरून बाहेरील विद्यार्थी आत बोर्डिंगमध्ये प्रवेश करता कामा नये.

३) रात्री १०.३० वाजेपर्यंत बोर्डिंगचे उघडे ठेवण्यात येते. त्यानंतर बोर्डिंगची सर्व गेट बंद केली जातात.[११]

**३) धर्मशिक्षण :**

द. भा. जैन सभेची सांगली, बेळगाव, कोल्हापूर, हुबळी, इचलकरंजी या पाच ठिकाणी जी विद्यार्थी वस्तीगृहे आहेत. हायस्कूलपासून एम.ए. एल.एल.बी. पर्यंत सर्व प्रकारचे तेथे विद्यार्थी आहेत. सदर वस्तीगृहात राहणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना बालबोध जैन धर्म १/२ व भाग ३/४ आणि श्रावकाचार या तीन पुस्तकांचा अभ्यास करावा लागत असे.[१२] वस्तीगृहाच्या विद्यार्थ्यांवर धार्मिक व नैतिक संस्कार करून त्यांना चारित्र्यवान जैन नागरिक निर्माण करणे हेही दक्षिण भारत जैन सभेच्या ध्येयाचे एक प्रमुख अंग आहे. त्या दृष्टीने धार्मिक वातावरण वाढविण्याची व विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण देण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी सभेने स्वीकारली आहे.

प्रत्यक्ष नियमित अभ्यासक्रम सोडून विद्यार्थ्यांच्या जीवनावर संस्कार व्हावेत. ऐहिक जीवनक्रमा मध्येही त्यांनी नीतीने रहावे याकरिता संस्थेच्या चालकांनी धार्मिक शिक्षण देण्याचा स्तुत्य उपक्रम प्रारंभापासून सुरू केलेला आहे. आरंभांच्या काही वर्षामध्ये शास्त्री व पंडितांनी विद्यार्थ्यांवर धार्मिक शिक्षण देऊन सुसंस्कार करण्याचा प्रयत्न केला आहे. आजमितीसही धार्मिक शिक्षण विद्यार्थ्यांस दिले जाते आहे. प्रत्येकवर्षी धार्मिक परीक्षाच्या निकालाचा प्रवेश देण्यापूर्वी विचार केला जातो. तसेच धार्मिक शिक्षकांचे अध्यापन व सायंकाळी प्रार्थना नियमितपणे चालू असतात.[१३]

दक्षिण भारत जैन सभेच्या सुरुवातीचा उपक्रम म्हणजे उपाध्याय वर्गातील मुले जमवून संस्कृत पाठशाळा काढावयाच्या व त्यातच जैन धर्माचे शिक्षण देऊन पंडित शास्त्री घेऊन सभेने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना धर्मशिक्षण दिले. आजच्या अभ्यासक्रमात सरकारने नागरिक व सांस्कृतिक शिक्षणाचा पुरस्कार केला असल्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांना आपला धर्म, आपली संस्कृती, आपली धर्मतत्वे यांची स्थूल कल्पना असण्याची जिज्ञासूवृत्ती निर्माण झालेली आहे.[१४]

## ४. कमवा व शिका योजना

व्यवस्थापनाकडून 'कमवा व शिका' या योजना विद्यार्थ्यांसाठी लागू केलेली आहे. २० व्या शतकाच्या सुरुवातीस कमवा व शिका या योजनेचा अगदी कमी विद्यार्थी त्याचा लाभ घेत होते. परंतु नंतरच्या काळात कमवा व शिका या योजनेला महत्व प्राप्त झाले. कमवा व शिका योजनेमध्ये विद्यार्थ्यांना बागकाम, गेटवर थांबणे तसेच ग्रंथालयामधील पुस्तकांची देवघेव करणे, मेसमध्ये काम करणे, त्याचप्रमाणे द. भा. जैन सभेचे कार्यक्रम मिटिंग वगैरे असल्यास त्यांना ज्या ज्या गरजेविषयीच्या वस्तू पाहिजे असतात त्या सर्व हे विद्यार्थी आणून देतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा खर्च बाहेर पडतो. तसेच व्यवस्थापनावरील आर्थिक खर्च कमी होत असे. उदा. सांगली, कोल्हापूर, बेळगाव, हुबळी या ठिकाणी कमवा व शिका ही योजना अगदी वृद्धींगत झालेली आहे व याचा कित्येक विद्यार्थी लाभ घेत आहेत. तसेच श्राविकाश्रमामध्ये देखील मुलांच्यासाठी, मेहदींचे कोर्स, रांगोळी स्पर्धा, लोकर विणणे, शिवणकाम इ. काम श्राविकाश्रमामध्ये मुलींना असते. 'कमवा व शिका' योजनेतील मुली मुलांप्रमाणेच आश्रम व्यवस्थापनास मदत करतात.[१५]

## ५) भोजन व्यवस्था

वसतिगृहाच्या आवारात बौद्धीक, शारीरिक विकासाला ऊर्जा प्राप्त करून देणाऱ्या शाकाहारी भोजनालयाची स्थापना करण्यात आली आहे. २० व्या शतकाच्या सुरुवातीस

वस्तीगृहातील भोजन विद्यार्थ्यांना मोफत दिले जात असे. त्या वेळेस विद्यार्थी संख्यादेखील बेताची होती. परंतु नंतर २० ते २५ वर्षाच्या अवधीत विद्यार्थी संख्या वाढू लागली तेव्हा विद्यार्थ्यांना मोफत भोजन देणे परवडनासे झाले व विद्यार्थ्यांना मासिक अल्प रक्कम ठरवून भोजन दिले जाऊ लागले. भोजनागृहामध्ये विद्यार्थ्यांवर कुठल्याही प्रकारचे दडपण त्यांच्यावर दिले जात नाही. तसेच वस्तीगृहात जवळपासच्या गावचे विद्यार्थी होते त्यामुळे त्यांना घराचे डबे विद्यार्थ्यांना वस्तीगृहामध्ये येऊ लागले. त्यामुळे मेसचे पैसे देऊ न शकणारे गरीब विद्यार्थीही येथे राहून शिकले. तरीदेखील मेसमधील विद्यार्थी संख्या कमी झाली नाही. मेसमध्ये विद्यार्थ्यांना भोजनव्यवस्था अगदी पुरेपूर व चांगली केलेली आहे. थोडक्यात बाहेरील मेसमधील जेवनापेक्षा कितीतरी चांगल्या पटीने वस्तीगृहातील मेसमध्ये भोजन विद्यार्थ्यांना अगदी अल्प किंमतीत आजही दिले जाते.[१६] उदा. सांगली येथे अन्नपूर्णा भोजनगृह सर्व सोयीनियुक्त, प्रशस्त व मोठे असे हे भोजनगृह आहे. तसेच कोल्हापूर, हुबळी, बेळगाव व सांगली, कोल्हापूर येथे असणाऱ्या श्राविकाश्रम व वस्तीगृहामध्ये भोजनगृहात चांगल्या सोयी पुरविल्या जातात.

**६) व्यायामशाळा**

बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकास व्हावा म्हणून सर्व साधनांनी सज्ज असे व्यायामशाळेची निर्मिती प्रत्येक बोर्डिंगच्या आवारात केली आहे. यामध्ये किमान विद्यार्थी रोज एक तास तरी व्यायाम करतात व व्यायामशाळेचा उपयोग करून चांगली शरीरयष्टी घडवतात काही शरीसौष्ठव स्पर्धेच्या माध्यमातून ते आपले भविष्य घडविण्याचा प्रयत्न करतात.

**७) ग्रंथालय**

सभेची स्थापना झाल्यानंतर त्यांच्या वस्तीगृहाची क्रमाक्रमाने स्थापना झाली. तेव्हा सुरुवातीस प्रत्येक वस्तीगृहामध्ये ग्रंथालय स्थापना करण्यास आली. या ग्रंथालयामध्ये

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विद्यार्थ्यांना लागणारी अभ्यासोपयोगी ग्रंथ तसेच काही धार्मिक पुस्तके, काही कथासंगह तसेच काही गोष्टीरूप पुस्तके, तसेच नियतकालिके यांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामध्ये सर्व दैनिक वर्तमानपत्रे, मॅगझिन्स, साप्ताहिके, मासिके मागविली जातात. दैनंदिन वर्तमानपत्रातून विद्यार्थ्यांना आधुनिक चालू घडामोडीचे ज्ञान मिळते. तसेच त्यांना त्यामध्ये नोकरीसाठी वगैरेचे अर्ज पहावयास मिळतात. उदा. सांगलीमधील ग्रंथालय, वाचनालय अगदी सुसज्ज व भरपूर क्रमिक पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच कोल्हापूर वस्तीगृहामधील डॉ. ए. एन. उपाध्ये ग्रंथालयदेखील प्रशस्त चांगले आणि मोठे आहे. त्याचप्रमाणे बेळगाव व हुबळी या ठिकाणाचे ग्रंथालय देखील अगदी चांगल्या तऱ्हेने विकास पावले आहेत.[१७]

त्याप्रमाणे हे सर्व विद्यार्थी कार्यकर्ते गावोगावी देणग्या फंड गोळा करत होते. तेव्हा या विद्यार्थी व कार्यकर्त्यांचा त्या त्या गावातील लोकांशी त्याचा संपर्क आला. कार्यकर्त्यांनी जैन समाजातील लोकांना सभेचे महत्व व त्यामागील भूमिका व वस्तीगृहाची गरज याचे महत्व पटवून दिले. तसेच वेगवेगळ्या गावातील कार्यक्रमामध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होऊ लागला. तेव्हा विद्यार्थी व कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष समाजाशी एकत्र संबंध हा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमातून येऊ लागला. त्यामुळे सभेच्या कार्यकर्त्यांशी त्यांची जवळीकता वाढली व प्रतिष्ठित लोकांच्या देणगीचा लोंढा सभेकडे वळू लागला.[१८]

## वस्तीगृहांची अर्थव्यवस्था

शिक्षण प्रसार हा सभेच्या हेतूपैकी एक प्रमुख हेतू असल्याने सभेने सुरुवातीपासूनच जसा एक स्वतंत्र विद्या विभाग निर्माण केला. त्याप्रमाणे विद्याप्रसारासाठी लागणारे द्रव्य सहाय्य मिळविण्याकरिता सभेने एक स्वतंत्र शिक्षण फंडदेखील सुरुवातीपासून निर्माण केला. शिक्षण फंडाचे काम सातत्याने व जलदगतीने व विश्वासाने व्हावे म्हणून हे काम सभेच्या प्रमुख कार्यकर्त्यांकडे सोपविले होते. हे कार्यकर्ते गावोगावी फिरून जैनांच्या सभेचा उद्देश समजावून सांगत आणि शिक्षण फंडास मदत करण्याचे आवाहन देत. ही मदत देणगीच्या

स्वरूपात स्वीकारली जात असे. अशी देणगी रोख दिल्यास ती जास्त पसंत केली जात असे. पण लोकांना देणगी देण्यास उद्युक्त करण्यासाठी एक आगळी पद्धती सुरू करण्यात आली. देणगीदारो देणगीची रक्कम जाहीर करून ती सभेची रक्कम समजून ती स्वत:कडे ठेव म्हणून ठेवावयाची व त्या रकमेवर सभेला ठराविक दराने दरसाल व्याज द्यावयाचे अशी ही पद्धत होती. या पद्धतीनुसार १९०२ साल अखेर जवळजवळ २० हजार रुपयांचा शिक्षण फंड जमला होता व त्यावरील व्याज देणगीदारांकडून वसूल केले जात होते. सभेच्या पहिल्या तीन चार वर्षात एवढी मोठी रक्कम जमा झाली. हे सभेच्या कामाला मिळालेले प्रशस्तीपत्र होय.[१९]

शेठ माणिकचंद यांना जैनांबद्दल इतकी कळकळ वाटे की त्यांनी स्वत: लाखो रुपये शिक्षणाकरिता खर्च केले व इतर लोकांना करावयास लावले. फंडासाठी मानापमानाकडे न पाहता प्रत्येकाच्या घरी ते स्वत: जात फंडासाठी खेडेगावात गेल्यावर तेथील प्रमुख लोकांना शेठच्या निवासस्थानाकडे बोलावून आणतो असे कोणी सांगितले तर ते म्हणत की आपण भिक्षेसाठी आलो आहोत, त्यांना न बोलावता त्यांच्या घरी आपण होऊनच जाणे चांगले तेव्हा जास्त फायदा होणार, ज्या ज्या ठिकाणी शेठजी जात तेथून विमुख होऊन ते केव्हाच परत येत नसत व त्यांच्या काम करण्याच्या शैलीने सर्व भागातील जैन वस्तीगृहे उत्तम चालू लागली. या कामाकरिता त्यांच्याबरोबर श्री. लट्ठे, श्री. मालगावे, श्री. हंजे यांनी फारच मेहनत घेतली.[२०]

## कोल्हापूर वस्तीगृहाच्या जागेच्या मिळकतीतून येणारी रक्कम

कै. छत्रपती राजाराम महाराज यांचीही त्यांचे परमपूज्य पिताजी राजर्षी शाहू महाराज यांच्या सारखीच दलित वर्गाच्या व मागासलेल्या वर्गाच्या शैक्षणिक कार्याबद्दल ख्याती होती. त्यांच्याही कारकीर्दीत त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था निर्माण केल्या व वाढवल्या व आर्थिक सहाय्य देऊन अनेकांच्या उन्नतीला हातभार लावला. जैन समाजावरही त्यांचे फार प्रेम होते व त्याचे द्योतक म्हणून त्यांनी लक्ष्मीपुरीतील वसाहतीत मुख्य रस्त्यावरील दोन जागा

१९२७ साली या वस्तीगृहास देणगी म्हणून दिल्या. १९२७ साली लक्ष्मीपुरीतील देणगी दिलेल्या जागांवर प्रथम दोन छोट्या इमारती बांधल्या गेल्या होत्या. या जागांपैकी सि. स. नंबर १५१९ ची जागा १९३४-३५ चे दरम्यान अधिक विस्तृतपणे बांधण्यात आली. या जागेचे बांधकामाकरिता संस्थेचे ८०००/- रु. खर्च केले. दुसरी जागा सि. स. नं. १५३१ ही १९४९-५० साली दुरुस्ती करून व्यवस्थित बांधण्यात आली. त्यासाठी संस्थेने सुमारे १४,०० रु. खर्च केले. या जागेच्या पाठीमागेही बरीच जागा खुली होती. ही जागा व्यापारी दृष्टीकोनातून अत्यंत उलाढालीची असलेमुळे खुल्या जागेवर पुनः इमारत बांधणेचा चालकांनी निर्णय घेतला व १८५३-५४ इ. साली सुमारे १७,००० रु. खर्च करून ४ खणाची एक इमारती या खुल्या जागेवर उभी केली. या इमारतीचा पायाभरणी समारंभ श्री. बंडो भाऊ सुलताने यांच्या हस्ते करण्यात आला होता. पुनः १९५७ साली याच इमारतीची वाढ करण्यात आली व सुमारे १८,००० रु. खर्च करून आणखी तीन खण जागा बांधण्यात आली. या इमारतीचा पायाभरणी समारंभ श्री. बी. बी. पाटील कापड व्यापारी यांचे शुभहस्ते करण्यात आला. सदरच्या लक्ष्मीपुरीतील दोन्ही जागांचे महत्व लक्षात घेता त्यांच्या मूळच्या इमारतीमध्ये वाढ केल्यामुळे संस्थेच्या आर्थिक फायद्यामध्ये भरच पडत गेली. सुरूवातीस या इमारतीचे भाडे वार्षिक सुमारे ८००० ते ९००० रु. पर्यंत होते. संस्थेला आर्थिक स्थैर्य लाभण्याच्या दृष्टीने या दोन्ही जागांची देणगी व त्यावर संस्थेने उभारलेल्या इमारती फारच उपयोगी ठरल्या.

स्वातंत्र्योत्तर काळात महागाईमुळे व व्यवस्थापन खर्च वाढल्याने जैन बोर्डिंगची आर्थिक स्थिती या काळामध्ये बिकटच झाली. भाड्याच्या उद्देशाने दोन इमारती लक्ष्मीपुरीमध्ये बांधल्या गेल्या होत्या व तेथे अनेक कुळे राहिली होती. पण भाडे कमी यायचे व तेही वेळेवर मिळत नसे. तेव्हा अनेक कुळांवर दावे दाखल करावे लागले. हळूहळू तीन चार वर्षाच्या काळात एका जागेवरची कुळे मोकळी झाली. त्या जागेची पुर्नबांधणी व दुरुस्ती

करण्यात आली आणि मग सुमारे ४ ते ५ हजार रुपयांनी भाड्यांमध्ये वाढ झाली व कामावर तात्या व त्यांचे सहकारी रामभाऊ लिगाडे हे लक्ष देत होते. कालांतराने आणखी काही भाड्याच्या जागा मोकळ्या होऊन मिळाल्या आणि मग तेथेही दोन टप्प्यांमध्ये इमारती बांधण्यात आली. त्यामुळे १९६० च्या सुमारास भाड्याचे उत्पन्न १० हजार रुपयांवर गेले. या इमारतीसाठी प्रसंगी मिळेल ती देणगी मा. तात्या स्वीकारीत असत. बँकांकडूनही कर्जाऊ रक्कमा घेत व वेळप्रसंगी भाड्याच्या उत्पन्नातूनही पैसे एकत्र करीत भाडे उत्पन्न हे वाढल्यामुळे विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप देणे शक्य झाले.

सन १९६३ च्या सुमारास बोर्डिंगमध्ये विद्यार्थ्यांना पुन्हा जागा अपुरी पडू लागली. त्यामुळे जादा खोल्या बांधण्याचा निर्णय घेतला. अनेक माजी विद्यार्थ्यांकडे देणग्या मागितल्या. डॉ. ए. एन. उपाध्ये, डॉ. बकुल सुलताने, श्री. बापूसाहेब मिरजे यांनी स्वत: फिरून देणग्या मिळवण्यासाठी प्रयत्न केले. तीन वर्षांच्या कालावधीत लाखावर रक्कम जमविली व खोल्या बांधल्या.[२१]

विद्यार्थी वस्तीगृहाचा विस्तार व वाढता व्याप यासाठी नियमित व पुरेसे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याची निकड बोर्डिंगच्या चालकांना तीव्रतेने भासू लागली. बोडिंगचे सिटी सर्व्हे नंबर १५१९ व १५३१ या दोन जागांवर बांधलेल्या इमारतीतून येणाऱ्या भाड्याचे उत्पन्न पुन्हा अपुरे पडू लागले. कसेही करून हे उत्पन्न वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे याची चालकांना जाणीव झाली. त्यांनी सर्व गोष्टींचा साधक बाधक विचार करून लक्ष्मीपुरीच्या व्यापारी विभागाच्या अगदी हमरस्त्यावरील असलेली सिटी सर्व्हे नंबर १५१९ वरील १९३४ साली बांधलेली इमारत पाडावी आणि त्याच जागी आधुनिक तऱ्हेच्या मोठ्या बँक कंपन्या यांच्या मुख्य कार्यालयांना उपयुक्त असलेली सात मजली टोलेजंग इमारत उठवावी अशी एक महत्वकांक्षा पण नवीन कालाला अनुरूप अशी योजना आखली. ही मोठी योजना कार्यवाहित आणण्यासाठी चालकांनी अत्यंत जिद्दीने व चिकाटीने सर्वदूर

परिश्रम घेतले आणि संकल्पित भव्य वास्तू अतिशय जिद्दीने व तडफेने बांधून पुरी केली. या वास्तूचा भूमिपूजन समारंभ योजनेचे सूत्रधार श्री. शांतीनाथ तवनाप्पा पाटणे यांच्या हस्ते व लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. २९/८/१९६९ रोजी या वास्तूचा पायाभरणी समारंभ बोर्डिंगचे अध्वर्यु डॉ. ए. एन. उपाध्ये यांच्या हस्ते पार पडला. तसेच या वास्तूचा कोनशिला समारंभ ७/१२/१९६९ रोजी बोर्डिंगचे पितामह शेठ माणिकचंद हिराचंद यांच्या घरातील कर्तबगार नेते शेठ धन्यकुमार ठाकोरदास जव्हेरी मुंबई यांच्या हस्ते संपन्न झाला. या वास्तूचे बांधकाम जलद गतीने पुरे करण्यात येऊन तिचे वास्तूशांती विधान बोर्डिंगचे सुपरिटेंडेट श्री. विलास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले आणि या वास्तूला जैन परंपरेतील अतिशय मनोज्ञ व अन्वर्थक असे 'जयधवल' नाव देण्यात आले. त्यावेळी कोल्हापुरातील उंच व अगदी नवीन पद्धतीने बांधलेल्या या जयधवल वास्तूचा उद्घाटन समारंभ २८/८/१९७० रोजी सभेच्या प्रारंभीच्या काळातील प्रमुख मार्गदर्शक व जैनांचे मान्यवर नेते शेठ हिराचंद नेमचंद दोशी यांचे सुपुत्र व प्रसिद्ध उद्योगपती शेठ लालचंद हिराचंद दोशी यांच्या शुभ हस्ते मोठ्या उत्साहपूर्ण व कार्यपूर्तीच्या वातावरणात संपन्न झाला. तसेच कोल्हापूर बोर्डिंगच्या सर्वांगीण अभिवृद्धीसाठी सातत्याने मदत व मार्गदर्शन करणारे व आंतरराष्ट्रीय किर्ती मिळविणारे प्रकांड पंडित डॉ. ए. एन. उपाध्ये आणि कोल्हापूर बोर्डिंगला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देऊन त्यातून बोर्डिंगच्या उन्नतीसाठी सर्वतोपरी सक्रिय हातभार लावणारे व त्यासाठी अहनिश झटणारे सभेचे खजिनदार श्री. शांतीनाथ तवन्नाप्पा (तात्या) पाटणे या दोन नेत्यांच्या दीर्घकालीन व उपयुक्त सेवेचा उचित गौरव केला गेला. शिवाय त्याच दिवशी म्हणजे २८/८/१९७० रोजी जयधवल इमारतीला लागून मागील बाजूस, बांधावयाच्या इमारतीचा कोनशीला समारंभ सभेचे ज्येष्ठ व कार्यकुशल नेते श्री. बी. बी. चौधरी वकील सांगली यांच्या हस्ते करण्यात आला. थोड्याच काळात जयधवल इमारतीच्या मागील बाजूने तेवढ्याच उंचीची विस्तारित इमारत तयार झाली. या विस्तारासहित संपूर्ण

जयधवल इमारतीच्या बांधकामावर बँक ऑफ बडोदा इंडिया, रत्नाकर बँक व महाराष्ट्र स्टेट फायनान्स कॉर्पोरेशन यांच्याकडून दीर्घ मुदतीची कर्जे घेऊन सुमारे १० लाख रुपये खर्च करण्यात आले. हा खर्च अगदी सार्थकी ठरला कारण या जयधवल इमारतीपासून वर्षाला अंदाजे १,६०,००० रुपये भाड्याचे उत्पन्न बोर्डिंगला मिळते. तसेच सिटी सर्व्हे नंबर १५३१ वरील बांधलेल्या दुकानाचे महिना सुमारे १०,००० रुपये भाडे मिळते. अशा रीतीने बोर्डिंगच्या चालकांनी प्रतिवर्षी, १, ७०,००० रु. च्या भाड्याच्या नियमित उत्पन्नाची कायमची तरतूद करून बोर्डिंगला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्यामध्ये अत्यंत मोलाची व समयोचित कामगिरी करून दाखविले.[२२]

## हुबळी बोर्डिंग

हुबळी बोर्डिंगला १९२५ ते १९४५ ही वर्षे फार वाईट गेली. बोर्डिंगला कायम उत्पन्नाची विशेष तरतूद नसल्याने विद्यार्थ्यांना विविध सोयी उपलब्ध करून देणे चालकांना जड जात होते. सभेला हुबळी बोर्डिंगविषयी आस्था नाही असे हुबळीकरांना वाटत होते. तर हुबळीकर बोर्डिंगसाठी काही कायर्अ करीत नाहीत अशी सभेची तक्रार होती. अशा परस्पर गैरसमजुतीच्या वातावरणाचा बोर्डिंगच्या जागेबद्दलच्या मोठ्या कोर्ट कटकटी चालू झाल्या. मुरसावीर मठाच्या स्वामींना मठाच्या मालकीची जागा निरंतर भाडेपट्याने दुसऱ्याला देण्याचा अधिकार नसल्याने त्यांनी जैन बोर्डिंगला दिलेली जागा आपल्याला परत मिळावी म्हणून मठाच्या त्यावेळच्या स्वामींनी बोर्डिंगविरुद्ध दावा दाखल केला. हा दावा बोर्डिंगला सुप्रीम कोटापर्यंत लढवावा लागला. त्यासाठी २० ते २५ हजार रुपये खर्च करावे लागले. विशेष म्हणजे १९१९ साली श्री. पंपावती बल्लाळराव देसाई यांनी दिलेली २२००/- रु. किंमतीची जमीन आणि १९२१ साली श्रीमंत नागपय्या रंगपय्या देशपांडे यांनी दिलेली २० हजार रु. किंमतीची जमीन, अशा दोन्ही जमिनी कोर्ट खर्चासाठी विक्री करणे भाग पडले.[२३] १९२३ च्या अखेरीस या दाव्याचा निकाल सभेसारखा झाल्याने सभेच्या व हुबळीच्या कार्यकर्त्यांना

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कामासाठी उत्साह निर्माण झाला. या कोर्ट कचेरीच्या कामात हुबळीचे प्रसिद्ध वकील श्री. एस. पी. इंडी यांनी अत्यंत परिश्रम घेतले व सर्व काम विनावेतन केले. त्यांच्या परिश्रमामुळेच सभेची मोठी इस्टेट वाचली आणि हरलापूरची जमीन मिळाली.[२४]

बोर्डिंगच्या विकासाला १९६५ पर्यंत काही गती आली नाही. श्री. पंपावती बल्लाळराव देसाई, श्री. रामप्पा दादा पत्रावळी, नी. एस. टी. मालमती, श्री. शांतीनाथ इंगळे, श्री. नेलवगी, श्री. एस. पी. पडेसूर, श्री. पी. पी. जवळी, श्री. रंजनगोंडा पाटील, श्री. गुडी सागरचे फौजदार हिरेगौडर, पी. एच. गुंजाळ, श्री. अनंतप्पा सिद्धाप्पा घोंगडी, श्री. आण्णाप्पा बसाप्पा बासूर, श्री. देवेंद्रप्पा बुकडवि, कलघटगी, श्री. रामनगोंडा पाटील, श्री. देवेंद्रप्पा कुंटूर, श्री. रामनगोंडा पाटील, श्री. पायनगोंडा नागनगोंडा पाटील, श्री. रामगोंडा अनंतगोंडा पाटील, श्री. नेमचंद्राप्पा धरणाप्पा सुजी, श्री. डी. एल. बागी आदी बोर्डिंगच्या पदाधिकाऱ्यांनी अगदी बिकट परिस्थितीत बोर्डिंगचा कार्यभार चालू ठेवल्यामुळे हे बोर्डिंग टिकले. बोर्डिंगच्या दृष्टीकोनातून १९५९ साली एक महत्वाची घटना घडली. म्हैसूर सरकारने हुबळी जैन बोर्डिंगच्या इस्टेटीला रेंट कंट्रोल ॲक्टमधून मुक्त केले. त्यामुळे मुख्य स्टेशन रोडवर असलेल्या व अत्यंत कमी दराने दुकानांना भाड्याने दिलेल्या बोर्डिंगच्या आवारातून साध्या इमारती बोर्डिंगला परत मिळविणे सोपे झाले. त्यामुळे अर्ध्या जागेतील दुकानदार भाडेकरूंकडून बोर्डिंगने इमारती आपल्या ताब्यात घेतल्या आणि त्या जुन्या इमारती पाहून त्याच्या जागी अद्ययावत पद्धतीची मोठी इमारत उभी केली. या प्रकारे कोल्हापूर बोर्डिंगच्या धर्तीवर कायमच्या व भरपूर भाड्याच्या उत्पन्नाची बाब निर्माण केल्याने १९६५ पासून हुबळी बोर्डिंगच्या उर्जितावस्थेस प्रारंभ झाला. हा समाधानकारक आर्थिक बदल होण्यास सर्वश्री शांतप्पा होसमनी, देवेंद्रप्पा बागी, बी. ए. पाटील, रायप्पा टिंकण्णावर, शांतीनाथ इंगळे, एस. व्ही. हजारी, डी. एस. हजारी, व्ही. ए. रोकडे, जिनदत्त देसाई, श्रीमंत बाळासाहेब देशपांडे, पी. आर. जवळी, जे. पी. जवळी, एस. टी. अण्णीगेरी, सी. एन. पाटील,

लक्ष्मेश्वर, डी. जी. देशमाने, मानचंद चतूरचंद शहा, रामभाऊ पत्रावळी, बी. डी. दिनकर, एम. आर. बरगाली, बी. एस. भुपाल, एम. एस. शेट्यापन्नावर, पी. एस. धरणेपण्णावर, पार्श्वमल चोप्रा इत्यादी कार्यकर्त्यांचे अविरत परिश्रम कारणीभूत झाले. या सुमारास बोर्डिंगला आर्थिक फायदा देणारी घरे बक्षीस मिळाली. श्रीमती सुंदरव्वा देवेंद्रप्पा टकळकी हुबळी यांनी १७/७/१९६७ रोजी हुबळी शहरातील सिटी सर्व्हे नंबर ५२७ व ५२८ वरील दुकानांची जागा व सिटी सर्व्हे नंबर २८५१ वरील दुमजली घर बोर्डिंगला दान दिले. तसेच श्री. भुपालप्पा भरमाप्पा बेळगी हुबळी यांनी शहरातील सिटी सर्व्हे नंबर १८३४ वरील दुमजली घर बोर्डिंगला दान दिले.[२५]

नवीन कार्यकर्ते नियमित व पर्याप्त उत्पन्न आणि नवीन योजना यामुळे हुबळी बोडिअंग आता भरभराटीच्या मार्गावर आहे. 'गुरुकूल' पद्धतीचा अवलंब करून गरीब विद्यार्थ्यांचा जेवणखान, निवास, शिक्षण, कपडालत्ता आदी सर्व खर्च बोर्डिंगमार्फत दरसाल ५०००/- रु. स्कॉलरशीप दाखल वाटले जातात. बोर्डिंगच्या उत्पनाच्या बाबी वाढल्या असल्याने आता बोर्डिंगला आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले असून त्यातून जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांना मदत करणे व सोयी उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे. तसेच सभेच्या मॅनेजिंग कमेटीच्या बैठकी अधून मधून हुबळीला सारख्या घेतल्या जातात. त्यामुळे सध्या सभा व हुबळीचे कार्यकर्ते यामध्ये सामंजस्य व एकोपा निर्माण झाला आहे.[२६]

**बेळगाव जैन बोर्डिंग**

बेळगाव जैन बोर्डिंगला नियमित उत्पन्नाची तरतूद व्हावी या हेतूने बोर्डिंगच्या चालकांनी माणिकबागेमधील सिटी सर्व्हे नं. ४८८९ व ४८९० ची सुमारे २ एकर जागा वार्षिक ८०० रुपये भाडे याप्रमाणे २१ वर्षाच्या कराराने १८/८/१९३९ रोजी श्री. धर्माप्पा मिरजी यांच्या माणिकबाग ऑईल मिलला दिली. तसेच बोर्डिंगपुढील मोकळ्या जागेपैकी दक्षिणेकडील निम्म्याहून थोडी जास्त (१५ गुंठे) जागा टिंबर मर्चंट पत्रावळी ॲन्ड सन्स यांना

वार्षिक कबुलायतीने १५० रु. वार्षिक भाड्याने दिली. सुरुवातीला नाममात्र असलेली ही भाड्याची रक्कम पुढे पुढे अत्यंत अपुरी वाटू लागली. कारण नंतर बेळगावात जागांची भाडी बरीच वाढली होती. शिवाय बोर्डिंगच्या वाढत्या खर्चासाठी व बोर्डिंगमध्ये जादा सोयी उपलब्ध करून देण्यासाठी जास्ती उत्पनाची अतिशय जरूरी होती. म्हणून सभेच्या या भाडेकरूंनी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सभेकडून भाड्याने घेतलेल्या जागा स्वेच्छेने सभेला परत कराव्यात असे त्यांना आवाहन करण्यात आले. पण त्याचा काडीमात्रही उपयोग झाला नाही आणि उलट कटकटी मात्र वाढत गेल्या. कारण कायदा हा भाडेकरूंच्या बाजूला होता. तेव्हा कायद्यापेक्षा सामोपचाराने व वाटाघाटीने हा जटिल प्रश्न बोर्डिंगच्या हिताच्या दृष्टीने सोडविण्यासाठी सभेने प्रयत्न सुरू केले. या संदर्भात सभेने आपल्या १९५० सालच्या अहवालात आपल्या मनातील व्यथा व उराशी बाळगलेला कार्यकर्त्यांबद्दलचा आशावाद खालीलप्रमाणे प्रकट केला.

''मनात अतिशय तापदायक वाटणारी घटना म्हणजे बेळगाव येथील वस्तीगृहाच्या जागेचा विषय होय. सभेच्या मालकीची बोर्डिंगची सुमारे चार एक क्षेत्राची जागा असून तिचा व्हावा तसा उपयोग तेथील वस्तीगृहात होऊ शकत नाहीत. त्या जागेबद्दल लांब मुदतीचा भाडेपट्टा झाला असल्याने कायद्याने काही करता येत नाही. परंतु सभा ही सार्वजनिक संस्था आहे. सभेची मालमत्ता ही कोणाही व्यक्ती मालमत्ता नाही व मालकीची नाही कोणीही त्यातून स्वत:चा फायदा करून घेत नाही. या गोष्टी सर्वांना संमत आहेत. जरी कायद्याने काही करता येणार नसले तरी नैतिक बंधन म्हणून आणि समाजाचा व संस्थेचा प्रश्न असल्याने सदर जागी भाडेकरी म्हणून असलेले श्री. धर्माप्पाण्णा मिरजी हे या प्रश्नाचा निकाल तत्काळ करतील अशी आम्हास आशा आहे. श्री. मिरजी हे प्रथमपासूनच सभेचे सहाय्यक व तेथील वस्तीगृहाचे चेअरमन म्हणून आहेत आणि त्यामुळे या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावण्याची जबाबदारी प्रामुख्याने त्यांच्यावरच येते. यावर्षी सुदैवाने आम्हास अध्यक्षही श्री.

गुंजाळसाहेब मिळाले आहेत. ते मेळगावचे रहिवासी असल्याने बेळगाव बोर्डिंगचे सर्व प्रश्न व इतर अनुषंगिक प्रश्न तत्काळ व समाधानकारक निकालात निघतील अशी आशा बाळगल्यास ती अनाठायी ठरणार नाही."

परंतु सभेची ही आशा फलद्रुप झाली नाही. कोर्ट कचेरी वाटाघाटी करूनही श्री. मिरजी व पत्रावळी यांनी आपल्या ताब्यातील जागा सोडल्या नाहीत. शेवटी बऱ्याच परिश्रमानंतर श्री. मिरजी यांच्याकडील सुमारे दोन एकर जागा १९७१ साली सभेला परत मिळाली. पण अजूनपर्यंत श्री. पत्रावळी यांजकडील मोक्यावरची सुमारे १५ गुंठे जागा मात्र सभेला लवकर परत मिळालेली नाही.

सन १९७१ साली श्री. मिरजी यांच्याकडील जागा ताब्यात मिळाल्याने हमरस्त्याच्या बाजूला असलेल्या जागेवर दुकानाचे गाळे बांधण्यात आले आहेत. मागील मोकळ्या जागेत दोन मंगलकार्य बांधण्यात आली आहेत. अशा रितीने कोल्हापूर बोर्डिंगच्या धर्तीवर भाड्याच्या उत्पन्नाची नियमित व पर्याप्त सोय करण्यात आली आहे. अशा रीतीने बेळगाव बोर्डिंगच्या योजनापूर्वक विकास करण्यात आला आणि या विकासात सभेचे १९५८ सालचे अध्यक्ष व सभेचे धडाडीचे कार्यकर्ते श्री. भुपालराव देसाई यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच श्री. पी. पी. हंजी, श्री. आण्णप्पा कोल्हापुरे, श्री. चंद्रकांत कागवाड, श्री. धर्मराव कागवाड, श्री. देवेंद्रप्पा चौगले, श्री. कुबेरप्पा बोगार, श्री. सुरेंद्र ऊर्फ कोमलप्पा दोड्डण्णावर, श्री. डी. एस. परमाज वकील, श्री. महावीर कोल्हापुरे, श्री. धर्मु चिकण्णावर आदी प्रमुख कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन बोर्डिंगचा योजनापूर्वक विकास करण्यात मोठा हातभार लावला आहे.[२८]

बेळगाव येथील माणिकबाग जैन बोर्डिंगकडे प्रथमपासूनच उत्पन्नाचा ओघ आहे; पण त्यामध्ये लक्षणीय वाढ स्व. भुपालराव देसाई, श्री. चंद्रकांत कागवाड, श्री. कलीमनी आदींनी बोर्डिंगच्या पुढील बाजूस दोन मजली कमर्शियल कॉम्प्लेक्सची भव्य इमारत बांधून

HAPUR

महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे. या बोर्डिंगकडे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने अद्यापी भरपूर जागा उपलब्ध आहे आणि त्या जागेत विविध प्रकारचे छोटे छोटे उद्योग करणारी पाच पन्नास उद्योग केंद्रे आहेत. त्या जागेवर भव्य असे मार्केट उभे केल्यास बेळगावातील ते एक उत्तम औद्योगि मार्केट ठरणार आहे. तशी योजनाही येथील मंडळींच्या मनात आहे. १९८२ मध्ये संचालकांनी वस्तीगृहाचे वाढीव बांधकामास सुरुवातही केली. श्री. बाळासाहेब पाटील, श्री. कोमलराव दोडण्णावर, श्री. लेंगडे यांच्यासारखी मंडळी या कामात मदत करीत होती.[२९]

सभेच्या बेळगाव संस्थापकांनी 'शिष्यवृत्ती निधी' गोळा केली. तसेच ध्रुव फंड देखील गोळा करण्यास सुरुवात केली व जीवन संजीवनी निधी गोळा केला. त्याच्यामुळे सभेची आर्थिक परिस्थिती एकदम भक्कम बनली व त्याचा उपयोग माणिकबाग दिगंबर जैन बोर्डिंग बेळगाव या वस्तीगृहास त्याचा फार उपयोग झाला.[३०] बोर्डिंगचे वार्षिक उत्पन्न सन १९७३ पर्यंत ३४,००० रु. इतके होते. १९९७ मध्ये बेळगाव वस्तीगृहाचे वार्षिक उत्पन्न ४,४०,००० इतके झाले आहे.[३१]

## सांगली बोर्डिंग

बोर्डिंगचे पहिले सेक्रेटरी व सभेचे मार्गदर्शक नेते श्री. भाऊ रामगोंडा पाटील यांनी १९३५ साली तालीमखाना बांधून दिला. श्री. अनंतराव आरवाडे यांनी १९४० साली विहीर खोदून व बांधून दिली. विशेष म्हणजे बोर्डिंगच्या माजी विद्यार्थ्यांच्या देणग्यातून १९४५ साली माजी विद्यार्थी हॉल बांधण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी सन १९२२ पासून १९६५ पर्यंत फक्त ३४ खोल्याच उपलब्ध होत्या आणि त्यामध्ये ९० विद्यार्थ्यांची सोय होत होती. त्यात वाढ करणे आवश्यक झाल्याने १९६४ साली देणग्या जमवून १२ खोल्यांची तीन मजली इमारत बांधण्यात आली. या इमारतीला सुमारे ३६ हजार रुपये खर्च आला आणि तिचा उद्घाटन समारंभ शेठ लालचंद हिराचंद यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. त्यामुळे १९६५ पासून १२५ विद्यार्थ्यांची बोर्डिंगात सोय होऊ लागली.

सांगली बोर्डिंगच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेऊन सर्व जैनांची राष्ट्रव्यापी व प्रातिनिधीक संस्था असलेल्या 'भारत जैन महामंडळाचे' ३८ वे अधिवेशन यशस्वी केले. हे अधिवेशन २१/३/१९६४ रोजी बोर्डिंगच्या आवारात शेठ मोहनलालजी हुग्गड, कलकत्ता यांचे अध्यक्षतेखाली भरले होते आणि सभेचे ज्येष्ठ नेते श्री. बी. बी. चौधरी वकील हे या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष व शेठ देवचंद छगनलाल शाह निपाणी हे या अधिवेशनाचे उद्घाटक होते. या अधिवेशनामुळे लोकजागृतीचे कार्य साध्य झाले आणि या भागातील सभेच्या कार्यकर्त्यांचे भारताच्या विविध भागातील नेत्यांशी घनिष्ट संबंध प्रस्थापित झाले त्यामुळे वसतिगृहांना देणग्या मिळू लागल्या.

विद्यार्थ्यांची वाढती मागणी लक्षात घेऊन बोर्डिंगच्या चालकांनी बोर्डिंगच्या आवारातील पूर्व भागावरील जुनी कौलारू इमारत असलेल्या जागेवर अद्ययावत सोयीची आणि ८० खोल्या असलेल्या भव्य अशी तीन मजली इमारत बांधण्याचा संकल्प केला. या नियोजित इमारतीचा भूमिपूजन समारंभ विजयादशमीच्या मुहूर्तावर १७/१०/१९७२ रोजी सभेचे अध्वर्यु, बोर्डिंगचे शिल्पकार श्री. भाऊ रामगोंडा पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. इ.स. १९७४ पर्यंत २६ खोल्या बांधून झाल्या. या नूतन इमारतीचे उद्घाटन सभेचे खजिनदार व कोल्हापूर बोर्डिंगच्या विकासाचे सुत्रधार श्री. शांतीनाथ तवनाप्पा पाटणे यांच्या हस्ते सांगली बोर्डिंगचे माजी विद्यार्थी श्री. देवेंद्र तात्या पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि. २०/१/१९७४ रोजी करण्यात आले. या नवीन इमारतीतील खोल्यामुळे १९७५ पासून सुमारे १७५ विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय बोर्डिंगमध्ये झाली आहे.

तसेच विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करणेही जरूरीचे झाले आहे. बोर्डिंगतर्फे १९६० सालापर्यंत वार्षिक फक्त ५०० रुपयांपर्यंत शिष्यवृत्त्या दिल्या जात होत्या आणि १९६० नंतर ही रक्कम वाढवून १००० रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. अर्थात यात वाढ करण्याची कितीतरी निवड आहे. पण त्यासाठी बोर्डिंगला कोल्हापूर बोर्डिंगच्या धर्तीवर नियमित व

पर्याप्त असे भाड्याचे उत्पन्न उपलब्ध झाले पाहिजे असे मत डॉ. विलास संगवे यांनी आपल्या दक्षिण भारत जैन सभेच्या इतिहासात व्यक्त केले आहे.[३२]

सांगली येथील जैन बोर्डिंगकडे मिळकतीतून भाड्याचे उत्पन्न मिळण्यासारखी कोणतीही सोय नव्हती. त्यामुळे त्याच्या उत्पन्नास मर्यादा पडली होती. तथापि पाच, सात त्यानंतर श्री. बिरनाळे, श्री. श्रीकांत पाटील, श्री. राजगोंडा पाटील आदींनी वस्तीगृहाच्या इमारतीच्या वाढीसाठी प्रयत्न केले.[३३]

सांगली जैन बोर्डिंगला उत्पन्नाचे साधन काहीच नाही, म्हणून मा. तात्या पाटणे यांनी सांगली बोर्डिंगच्या उत्तरेकडील फ्रंटेजला बांधकाम करून दुकानगाळे, ऑफिसकरिता इमारत बांधण्याचा पर्याय सांगली जैन बोर्डिंगच्या मॅनेजिंक कमिटीपुढे ठेवला. पण दुर्दैवाने कामात कोणतीही प्रगती झाली नाही. त्यानंतर १९८५ मध्ये सभेचे ६८ वे अधिवेशन घ्यावयाचे ठरवले. सर्वश्री बाबासो बोरगावे, वसंतराव बिरनाळे, जिनपाल भोरेआण्णा, भुपालराव आरवाडे, शामराव आरवाडे वगैरे आम्ही मंडळींनी हिरीरीने भाग घेऊन जास्तीत जास्त निधी जमविण्याचे ठरले. अधिवेशनास कमीत कमी खर्च करून रु. ५१,०००/- ची देणगी सांगली बोर्डिंगच्या इमारत निधीस शिल्लक ठेवता आली. त्यामुळे १९८५ साली पूर्वेकडील तिसऱ्या मजल्याचे बांधकामास सुरुवात केली. पण बांधकामास पैसा कमी पडू लागला. सभेचे अध्यक्ष श्रीमान शांतीनाथ तवनाप्पा पाटणे यांनी सांगलीच्या लोकल कमिटी कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देऊन स्वत: देणगी गोळा करण्याकरिता गावोगाव फिरले त्यामुळे अल्पावधीतच तेरा खोल्यांची इमारत पूर्ण झाली.[३४]

या बोर्डिंगला नियमित व पर्याप्त उत्पन्न वाढविण्याची फार जरूरी होती. तेव्हा काही कार्यकर्त्यांनी बोर्डिंगबाहेर जी जागा मोकळी होती त्या जागेवर जवळपास एकाच आकाराचे दुकानगाळे भाड्याने देण्यासाठी बांधण्यात आले.[३५] जवळपास एकंदरीत १० दुकानगाळे बांधण्यात आले. तसेच समाजाच्या एखाद्या शुभकार्यासाठी म्हणून मंगलकार्यालयाचे

बांधकांम केले व ते एखाद्या धार्मिक व विवाह समारंभासाठी भाड्याने दिले जाऊ लागले. भाड्याने दिलेल्या गाळ्याचे भाडे व मंगलकार्यालयाचे भाडे यामुळे बोर्डिंगच्या आर्थिक उत्पन्नाच्या वाढीमध्ये मोठ्या प्रमाणात भर पडलेली आहे. यामुळे बोर्डिंगचे आर्थिक व्यवहार सुरळीतपणे चालू झाले. विद्यार्थ्यांना प्रत्येकवर्षी शिष्यवृत्त्यांची मदत केली जाणे शक्य झाले. बोर्डिंगच्या मालकीच्या या मालमत्तेमुळे बोर्डिंगला मोठ्या प्रमाणात आर्थिक सहकार्य प्राप्त झाले आहे.[३६]

## जैन श्राविकाश्रम कोल्हापूर

सन १९२३ साली श्रीमती शामाबाई मोरूसे या आपले शिक्षण संपल्यानंतर सोलापूरच्या श्राविकाश्रमात २ वर्षे सेवा देऊन परत कोल्हापूरला आल्या. पुणे व सोलापूरचा अनुभव व कार्याची तळमळ या गोष्टी धारण केलेल्या श्रीमती शामाबाई मोरूसे यांच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्या मिळाल्यामुळे सन १९११ साली बंद पडलेला कोल्हापूरचा आश्रम पुन्हा चालू झाला. तो आजतागायत उत्तम प्रकारे सुरू आहे.

सन १९२३ साली शाहूपुरीतील एका वाड्याच्या जागेत सदर आश्रम चालू झाला. स्वतंत्र जागेची आवश्यकता तीव्रतेने भासू लागली. सन १९२७ साली कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांच्याकडे लक्ष्मीपुरीतील जागा मागणीसाठी अर्ज करण्यात आला. स्व. आण्णासाहेब लठ्ठे त्यावेळी कोल्हापूरचे दिवाण होते. अर्ज मंजूर झाला व लक्ष्मीपुरीतील ७० व ७२ या नंबरचे दोन ब्लॉक्स छत्रपतींनी देणगीदाखल दिल्या या कामी स्व. लठ्ठे यांचे परिश्रम व मदत अत्यंत उपयोगी ठरले. लोकांकडून देणग्या जमवून इमारत बांधण्याचे काम सुरू झाले. या इमारतीच्या कोनशिला समारंभ गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर दि. २७/३/१९३३ रोजी श्री. आदिराज देवेंद्र उपाध्ये यांच्या हस्ते झाला आणि दि. १६/८/१९३४ रोजी नागपंचमीच्या मुहूर्तावर नवीन इमारतीत प्रवेश करण्यात आला. त्यावेळी कोल्हापूर दरबारने मोफत पाण्याचा नळ दिला व श्री. भुपाल आप्पाजी जिरगे यांनी

स्वखर्चाने दिवाबत्तीची सोय करून दिली व कोल्हापूर नगरपालिकेने आश्रमाच्या जागेत एक विहीर बांधून दिली. विशेष म्हणजे त्यावेळी शामाबाई मोरूसे यांनी एक हजार रुपयांची देणगी दिली व सक्रिय सहयोग दिला. पुढेही आश्रमाचे बांधकाम चालू राहून सन १९३५/३६ साली स्नानगृह व सन १९४४ साली कंपाऊंड भिंत बांधण्यात आली. या शांतीनाथ पाखे यांनी हे कार्य पुरे केले.[३७]

सभेला आजच्या परिस्थितीत खूप कार्य करण्याचे आवाहन उभे आहे. तशी नवीन पिढीची आगहाची मागणी आहे. सभेचा आयव्यय गेल्या काही वर्षात काही पटीत वाढलेला आहे आणि तो म्हणजे ठिकठिकाणची वस्तीगृहाची उत्पन्ने नजरेत भरण्यासारखी वाढलेली ाहेत. सभेच्या काही वस्तीगृहाकडे लाखाहून अधिक उत्पन्न जमा होत आहे. कोल्हापूर बोर्डिंगचे विद्यमान सेक्रेटरी सभेचे एक धडाडीचे नेते श्री. शांतीनाथ पाटणे, स्व. डॉ. उपाध्ये, श्री. ए. ए. पाटील, एन. ए. नांद्रेकर, डॉ. सुलताने आदींनी 'जयधवल' सारखी एक भव्य इमारत ८ ते १० लाख रुपये खर्चून बांधली असून या मिळकतीपासून दोन लाखाहून अधिक उत्पन्न आज मिळते आहे.[३८]

## सांगली जैन श्राविकाश्रम

सांगली महिलाश्रमाची उत्तरोत्तर उन्नती होत गेली. महिलाश्रमात जैन धर्माप्रमाणे वागणाऱ्या प्रौढ स्त्रियांची व मुलींची राहण्याची सोय फी घेऊन अगर मोफत करण्यात आली. तसेच आश्रमात राहणाऱ्या सर्वांवर सर्वतोपरी देखरेख ठेवून त्याचा विकास घडवून आणण्याची व्यवस्था करण्यात आली. शिवाय आश्रमाला जोडून शिक्षण कार्य हाती घेण्यात आले. त्यासाठी मुलीकरिता मराठी प्राथमिक शिक्षणाचे वर्ग आणि स्त्रियांकरिता साक्षरतेचे व व्यावहारिक ज्ञानाचे वर्ग उघडण्यात आले. हे वर्ग सर्व जातीच्या मुलींना व स्त्रियांना खुले ठेवण्यात आले. या लौकिक शिक्षणाबरोबरच धार्मिक व नैतिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, संगीत कलेचे शिक्षण आणि शिवण कामाचे शिक्षण देण्याची योग्य तरतूद करण्यात आली. या

सर्व गोष्टीमुळे महिलाश्रमाची उपयुक्तता पटल्याने सन १९३४ साली आश्रमात राहणाऱ्या मुलीची व स्त्रियांची संख्या ३० पर्यंत गेली आणि आश्रमाने चालविलेल्या परिपूर्ण प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींची संख्या १२५ पर्यंत गेली.

महिलाश्रमाचा व्याप सारखा वाढत होता व त्यासाठी मालकीच्या जागेची अत्यंत आवश्यकता होती. सन १९३४ साली वखार भागातील हल्लीची आश्रमाची इमारत विक्रीस निघाली होती. ही इमारत विशोष सोईस्कर वाटल्याने व आश्रमाच्या संचालिका श्रीमतीबाई कळंत्रे, यांच्या सूचनेवरून १२ हजार रुपये किंमत देऊन ती इमारत आश्रमासाठी खरेदी करण्यात आली. या खरेदीच्या कामी, कर्मवीर बळवंतराव धावते, श्री. बाबगोंडा भुजगोंडा पाटील, श्री. भाऊ रामगोंडा पाटील, श्री. भाऊसाहेब कुदळे, श्री. आण्णासाहेब कर्वे, श्री. बाळानाना चौगले, श्री. देवाप्पा निटवे, श्री. आखाडे बंधु आदी सभेच्या सांगलीच्या कार्यकर्त्यांनी मोठा पुढाकार घेतला.

महिलाश्रमाच्या वस्तीगृहाच्या इमारतीत फक्त २५ ते ३० मुलींचीच राहण्याची सोय करता येईल एवढी जागा होती. म्हणून जास्ती मुलींची सोय करण्यासाठी १९७२ ते १९७४ मध्ये इमारतीवर दुसरा मजला बांधण्यात आला. त्यामुळे ६० च्या वर मुलींची सोय झाली आहे. आश्रमाच्या इमारतीची ही उपयुक्त वाढ करण्याच्या कामी सभेचे माजी महामंत्री श्री. बंडेद्र बाळगौडा पाटील यांनी फार परिश्रम घेतले. तसेच श्री. बी. बी. चौधरी, श्री. केशवराव चौगुले, श्री. टी. के. पाटील, श्री. नेमगौडा पाटील, श्रीमती राजमती पाटील, सौ. हौसाबाई केशवराव चौगुले आदी सभेच्या सांगलीतील ज्येष्ठ नेत्यांचे सर्वतोपरी सहाय्य आश्रमाच्या कार्यासाठी लाभले आहे.[३९]

श्राविकाश्रमासाठी नियमित व पर्याप्त उत्पन्न प्राप्त होण्यासाठी मोठमोठ्या व्यक्तीच्या देणग्या श्राविकाश्रमाला प्राप्त झाल्या. त्यामुळे श्राविकाश्रमाला उत्पन्न वाढले. तेव्हा या निधीतून येणाऱ्या व्याजामधून गरीब विद्यार्थिनींना शिष्यवृत्त्या दिल्या जातात.[४०]

SHIVAJI UNIVERSITY

त्यासाठी धार्मिक परीक्षा उत्तीर्ण होणे सक्तीचे आहे. विद्यार्थिनीकडून अल्प प्रवेश फी आकारली जाते. तसेच काही गरीब विद्यार्थिनीना कमवा व शिका या योजनेमध्ये सामील करून घेतले जात असे व त्यांना राहणे व जेवणे हे विनावेतन दिले जाते. त्यामुळे गरीब विद्यार्थिनीना शिकण्यासाठी या श्राविकाश्रमांचा चांगला उपयोग झाला आहे.[४१]

## प्रतिष्ठीत व्यक्तीच्या मोठमोठ्या देणग्या

सभेच्या सुरूवातीपासून श्री. भुपाल आण्णा जिर्गे यांच्यासारख्या धर्मनिष्ठांनी हजारो रुपयांचा दानधर्म करून जैनांच्या औदार्याची तेजस्वी परंपरा चालू ठेवली आहे. सांगलीचे कर्मवीर धावते यांना द. भ. जैन सभेच्या ध्रुव फंडाकरिता समाजाकडे मदतीची मागणी केली. त्याबरोबर श्री. आण्णासाहेब कर्वे यांनी त्या फंडाला १२ हजार रुपयांची रोख मदत १९३४ मध्ये दिली.[४२]

इ. स. १९६३ मध्ये श्रीमान शेठ साहू शांतीप्रसाद जैन यांनी कोल्हापूर वस्तीगृहाला भेट दिली. त्यांच्या भेटीची स्मृती चिरंतन रहावी म्हणून वस्तीगृहाच्या एका इमारतीच्या एका दुमजली विभागाला 'शांतीनिलय' असे नामाभिधान देण्यात आले. श्रीमान शेठजींनी या प्रसंगाची आठवण म्हणून रु. ११,०००/- रु. ची उदार देणगी द. भा. जैन सभेला दिली. सभेने ही रक्कम कोल्हापूर जैन वस्तीगृहाकरिता दिली. तसेच सांगली ब्लॉक व वस्तीगृहाची मुख्य इमारत यांच्यामध्ये जी खुली जागा होती त्या जागेवर तीन खोल्यांची एक तीन मजली इमारत म्हणजे एकूण नऊ खोल्यांचे आराखडे व नियोजित रकमा निश्चित करण्यात आल्या. अशी ही बांधकामाची रूपरेखा निश्चित केल्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणीत झाला आणि एक वर्षाच्या अवधीत प्रत्येकी रु. ३५०/- (एका खोलीची किंमत) अशा रितीने अकरा दानशूर व्यक्तींकडून आश्वासने मिळवली. सांगली ब्लॉक या इमारतीवर आणखी एक मजला चढवून आणखी चार खोल्या वाढविण्याचे ठरले आणि त्याचे आराखडे व रकमा ठरल्या गेल्या. अशाप्रकारे गेल्या दीड वर्षामध्ये एकूण २१ खोल्या बांधण्याचा पालकांनी

संकल्प केला व सुमारे तितक्याच लोकांकडून प्रत्येकी एक साली पूर्ण करून देण्याचे आश्वासन मिळविले.[४३]

कर्वे व वग्यानी यांनी २२ हजार रुपये, श्री. जिनसेन भट्टारक पट्टाचार्य स्वामी महाराज यांनी ६०,००० रु., श्री. पत्रावळी यांनी ४,००० रु., हनगंडीचे श्रीमंत देसाई यांनी २,००० रु. आणि करवीर दरबारने दरसाल ३५०/- रु. स्कॉलरशीपकरिता सभेस दिले. याच रकमेच्या व्याजातून जैन समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जातात. मुळगुंदचे श्रीमंत देशपांडे यांनी २५,००० रु. किंमतीच्या जमिनी द. भा. जैन सभेस दिल्या आहेत.[४४]

वस्तीगृहातील सुधारणा करण्याकरिता कोल्हापूर वस्तीगृहाच्या हिरक महोत्सवाप्रसंगी वस्तीगृहाच्या इमारत निधीस श्रीमान साहू शांतीप्रसाद जैन रा. कलकत्ता यांनी ११,०००/० रु. भरघोस मदत जाहीर केली. तसेच श्री. भुपाल आण्णा बहिरशेट, श्री आण्णा बळवंत डुणुंग, रा. मुंबई, ॲड. एस. बी. वणकुद्रे, कोल्हापूर, श्री. ए. ए. पाटील, सौ. विजया दैवी रतनचंद शाह, श्री. बंडो भाऊ सुलताने, श्री. नागेंद्र आदप्पा निटवे, श्री. जयकुमार भरमगौडा पाटील, श्री. कल्लाप्पा भाऊ चौगुले, मे. डी. बी. देशिंगे या प्रतिष्ठीत व्यक्तींनी वस्तीगृह इमारत निधीस प्रत्येकी ३५०१/- ची भरीव आर्थिक मदत केली.[४५]
हुबळी जैन बोर्डींगच्या वज्र महोत्सवाच्या वेळी देखील हुबळी बोर्डींगला १५०१/- रु. ची मदत श्री. एस. टी. अन्नेगेरी यांनी केली. तसेच श्री. राघवेंद्र काशीनाथ नांदगेरकर, जे. बी. श्री. वर्मा ॲन्ड सन्स, श्रीमती राजमतीबाई सोनी, बी. टी. प्रायव्हेट लिमिटेड, आर. एल. बागी ॲन्ड सन्स यांनी प्रत्येकी १०००/- रु. याप्रमाणे देणगी हुबळी जैन बोर्डींगला दिली.[४६]

बोर्डींगचे आर्थिक स्थैर्य वाढून प्रगतीचा मार्ग सुकर व्हावा या उद्देशाने बऱ्याच दातारांनी नियमित उत्पन्न येणाऱ्या, स्थावर स्वरूपाच्या मालमत्ता देणगी दाखल दिल्या आहेत. माणगाव येथील सधन शेतकरी श्री. बाबू दादा चौगुले यांनी आपल्या मालकीची

सुपीक अशी ३॥ एकर जमीन खास बक्षीसपत्र देऊन बोर्डिंगच्या ताब्यात दिली. तेव्हापासून ही जमीन बोर्डिंगच्या वतीने कसण्यात येते आणि यामधून येणाऱ्या उत्पन्नातून दरसाल श्री. बाबु दादा चौगुले यांच्या नावाने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यात येतात. तसेच बोर्डिंगच्या कार्यकारी मंडळाचे उत्साही सदस्य श्री. देवेंद्रप्पा आप्पाजी मंगाज यांच्या इच्छेनुसार शाहूपुरीतील त्यांचे राहते घर त्याच्या पत्नींनी बोर्डिंगला दान दिले. त्याचप्रमाणे दानशूर श्री. भुपाल आप्पा जिरगे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी श्रीमती लक्ष्मीबाई यांनी रायबाग येथील जमीन बोर्डिंगला बक्षीस दिली.

इ.स. १९०६ सालापासून ही रक्कम ंदाजे दरसाल ५०००/- रुपये झाली आहे. साहजिकच निवासाच्या सोयीबरोबर मिळणाऱ्या या आर्थिक सहाय्याचा विद्यार्थ्यांना अतिशय उपयोग होतो.[४७]

काही महत्वाच्या व्यक्तींनी देखील देणग्या भरभरून दिल्या. स्वास्तिश्री जिनसेन भट्टारक नांदणी, श्री. आप्पाजी तवन्नाप्पा लडगे, श्री. अनंत आडव्याप्पा मंहगणी, श्री. रामाप्पा दादा पत्रावळी, श्री. आप्पासो भरमाप्पा पत्रावळी, श्री. केशवराव आप्पाजी चौगले, श्री. आप्पा दादा पाटील, दुधगाव, श्री. कोमलराव रामचंद्र दोडण्णावर, श्री. बळवंत धोंडी मगदूम, श्री. भुपाल अनंत आखाडे, श्री. भीमराव आण्णाराव चौगुले आदी व्यक्तींनी प्रत्येकी ४०००/- रु. या प्रमाणे सभेला देणगी दिली तसेच काही उच्चभ्रू व्यक्तींनी म्हणजेच श्री. पारीसा कालाप्पा हळीगळी, श्री. पारोसा राघोबा खोत, श्री. बाळगोंडा भाबगोंडा पाचवरे, श्री. डी. बी. पाटील वकील, श्री. बापूसो भाऊराव चौधरी, श्री. बळवंत जिन्नाप्पा जुगळे, श्री. कामदेव दुधाप्पा चौगुले या सर्व उच्चभ्रू व्यक्तींनी सभेला प्रत्येकी जवळ जवळ १०,०००/- रु. देणगी त्यांनी बोर्डिंगच्या विकासाकरिता व इतर काही कामाकरिता त्यांनी दिली.[४८]

कोल्हापूर बोर्डमधील सांगली ब्लॉक या इमारतीवर आणखी एक मजला चढवून १९६० नंतर आणखी ४ खोल्या वाढविण्याचे ठरले व त्याचे आराखडे व रकमा ठरल्या गेल्या. अशाप्रकारे गेल्या दीड वर्षामध्ये एकूण २१ खोल्या बांधण्याचा चालकांनी संकल्प केला व सुमारे तितक्याच लोकांकडून प्रत्येकी एक खोली पूर्ण करून देण्याचे आश्वासन मिळाले.

बांधकामाचा शुभारंभ ऑक्टोबर १९६२ रोजी विजयादशमीच्या सूमुहूर्तावर करण्यात आला. त्याच दिवशी पायाभरणी समारंभ द. भा. जैन सभेचे अध्यक्ष श्री. केशवराव चौगुले वकील सांगली यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगानिमित्त केलेल्या आपल्या छोट्या भाषणामध्ये श्री. चौगुले वकील यांनी द. भा. जैन सभेच्या ध्रुवफंडास वैयक्तिक रु. ५०००/- देणगी जाहीर केली व वस्तीगृह निधीला रु. ५०१/- ची देणगी देऊन या संस्थेस उपकृत केले.[४९] तसेच श्री. पंपावती बल्लाळराव देसाई यानी २२००/- रुपयांची मदत केली. तसेच श्री. मल्लाप्पा दुडाप्पा सगरे यांनी जमीन दान दिली यामुळे या इमारतीचे काम पूर्णत्वाला नेणे शक्य झाले.[५०]

### शिष्यवृत्तीसाठी मिळालेले दान :

देशातील विविध भागात पसरलेला जैन समाज प्रामुख्याने शेती व्यवसाय व नोकरीमध्ये गुंतलेला आहे. सातत्याने कष्ट करण्याची तयारी त्यासाठी लागणारी चिकाटी, बचतीची प्रवृत्ती, अहिंसात्मक धार्मिक प्रवृत्ती, दान करण्याची मानसिक तयारी, त्यासाठी असणारे धार्मिक विचार, प्रयोगशीलता गतीशिलता व यासाठी लागणारा शिक्षकाचा आग्रह ही प्रमुख वैशिष्ट्ये भारतातीरल प्रमुख समाजात दिसून येतो. द. भा. जैन सभा कार्यक्षेत्र असलेल्या कोल्हापूर, बेळगाव, सांगली, हुबळी, मुंबई, पुणे, औरंगाबाद या भागामध्ये चतुर्थ जैन शेती करतात. शेतकरी कुटुंबातील जैन स्त्रिया पशुपालन व दुग्ध व्यवसाय यामध्ये प्रगतीवर आहेत. व्यापाराच्या क्षेत्रात पंचम जैन अग्रेसर आहेत. मुंबई, पुणे, ठाणे, सांगली,

सोलापूर, बेळगाव, हुबळी, धारवाड, औरंगाबाद, फलटण, अकलुज, सोलापूर, बेळगाव या भागातील जैन पेढ्या अग्रेसर आहेत. धान्य कापड भांडी वाहन विक्री, सोन्या चांदीचा व्यवसाय आधुनिक तंत्रज्ञान, शिक्षण संस्था यामध्ये जैनाचा सहभाग लक्षणीय आहे. कासार, बोगार, शैतवाळ या जैन समाजाच्या उपजातीही व्यापार व पूरक व्यवसायामध्ये गुंतलेल्या आहेत. द. भा. जैन सभा ही दक्षिणेतील जैनांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी कोणत्याही अर्थलाभाची अपेक्षा न करता कार्य करणारी संस्था आहे.

२० व्या शतकातील आर्थिक व्यवहाराची दिशा प्रामुख्याने समाजातील सुख वस्तू दाताराकडून पैसा उभारून त्याचा वापर समाजातील दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी करणे हा आहे. या आलेल्या पैशातून प्रामुख्याने अल्पखर्चात शिक्षणासाठी शहरातील बोर्डिंग व श्राविकाश्रम आणि स्कॉलरशीपमधून विद्यार्थ्यांची सोय करून त्यांना सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. दानरूपातून म्हणजेच समाजाच्या पैशातून उभारलेल्या कोल्हापूर, सांगली, औरंगाबाद, हुबळी, बेळगाव, इचलकरंजी येथील विद्यार्थी वस्तीगृहाच्या व श्राविकाश्रमाच्या इमारती आज कोट्यवधी रुपयांची इस्टेट म्हणून द. भा. जैन सभेच्या अर्थव्यवस्थेची जमेची बाजू म्हणून पहावी लागते.[५१]

द. भा. जैन सभेकडे प्रामुख्याने स्कॉलरशीप फंड व लाईफ मेंबर फंड, पुरस्कारासाठी जमा केलेले फंड व इमारती यांचा समावेश होतो. गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्याच्या उद्देशाने समाजातील दानवीरांकडून स्कॉलरशीप फंडाची उभारणी करून तो फंड ठेव म्हणून सभा आपल्या खाती जमा करते व या फंडावर येणारे व्याज दरवर्षी स्कॉलरशीपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाटले जाते. स्कॉलरशीप फंडाची वाढती रक्कमही जैन समाजाच्या दातृत्वाचे व द. भा. जैन सभेत दिलेल्या नेतृत्वाचे उत्कृष्ट उदाहरण

आहे. दक्षिण भारत जैन सभेच्या कार्यकर्त्यांनी १०० वर्षाच्या कालखंडामध्ये विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या स्कॉलरशीप खालीलप्रमाणे जमा केल्या.

देणगी रूपाने मिळालेला शिक्षण फंड १९२०-१९७०[५२]

| | वर्ष | देणगीची रक्कम |
|---|---|---|
| १) | १९२०-१९३० | २७,०००/- |
| २) | १९३०-१९४० | १२,०००/- |
| ३) | १९४०-१९५० | ५,०००/- |
| ४) | १९५०-१९६० | १५,०००/- |
| ५) | १९६०-१९७० | ५,५५०/- |

१९७० नंतरच्या काळात स्कॉलरशीप फंडाचे देणगीदार व रक्कम वाढलेली दिसून येते. त्यामध्ये मोहनलाल चंद्रावती जैन ट्रस्ट दिल्ली यांनी १ लाख २५ हजार रु., श्री. देवगौडा एस. पाटील कोल्हापूर १ लाख रुपये, जवाहर आण्णाप्पा शेट्टी मंगसुळी ७५,००० रु. सिद्धगौडा पाटील पुणे, सौ. पुष्पादेवी गुंडवाडे प्रत्येक ६०,०००/- रु., पद्मावती देवर्षी सांगली आणि सुशिला पाटील कुपवाड प्रत्येकी ५१,०००/- रु. १९७० नंतर यांच्या भरघोस देणगीमुळे स्कॉलरशीप फंड मोठ्या प्रमाणात वाढला आहे. २५,०००/- रु. २० हजार, ११ हजार, १० हजार रु. या देणग्यामधून स्कॉलरशीप फंडास ६,२५,००० रुपये जमा झाले. २०,०००/- रु. आणि ५ हजार रुपये शिक्षण फंडासाठी देणाऱ्या देणगीदाराकडून इ. स. २००० पर्यंत ८६,११,००१ पर्यंतची रक्कम स्कॉलरशीप फंडात जमा झाली आहे.[५३]

सुरुवातीच्या काळात विद्यार्थी वस्तीगृह उभारणी व द. भा. जैन सभेच्या व्यवस्थापनामध्ये विद्यार्थी सहभाग घेऊन त्याच्या बदल्यात काही शैक्षणिक सुविधा मोफत देण्याची प्रथा सभेने सुरू केली. सभेचे कार्यकर्ते व विद्यार्थी गावोगावी हिंडून हा फंड गोळा

करीत यामध्ये सुधारणा होऊन सुरुवातीला धानिकाने दिलेली ठेवीची रक्कम त्याच्याकडे अमानत म्हणून राहील व त्यावर येणारे व्याज दरवर्षी तो धनिक सभेकडे सुपुर्द करीत. सुरुवातीस चांगला प्रतिसाद मिळाला पण नंतर व्याज देण्यात टाळाटाळ होऊ लागली व त्यामुळे विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप म्हणून देण्यात येणारा पैसा कमी पडू लागला. १९२३-२४ दरम्यान श्री. कर्वे व श्री. वग्यानी यांनी दिलेल्या भरघोस देणगीमुळे सभेचा स्वतंत्र स्कॉलरशीप फंड निर्माण झाला. १९२१/७५ पर्यंतच्या ५५ वर्षात ५ लाख रुपयांची रक्कम स्कॉलरशीप म्हणून वाटली गेली त्यापैकी ३.५० लाख रुपये सभेच्या मध्यवर्ती कार्यालयाने दिले.

१९७५ सालानंतर स्कॉलरशीप फंडास समाजाच्या सर्व थरातून भरघोस देणग्या मिळाल्याचे दिसते. या खेरीज बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांना एखाद्या विशिष्ट परीक्षेसाठी स्कॉलरशीप व देणग्या देणाऱ्याचे धोरण काही दातारांनी सुरू केले. त्यामध्ये १९७६ मध्ये सुरगौडा पाटील यांनी बी.एस्सी. मध्ये जास्त गुण मिळवून एम.एस्सी. करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ५०००/- रु. ठेव सभेगडे दिली. पद्मावती कोल्हापुरे यांनी विधवा स्त्रियांच्या शिष्यवृत्तीसाठी ६०००/- रु. ची शिष्यवृत्ती दिली. १९८४ साली ३ लाख सलेला स्कॉलरशीप फंड ९५ मध्ये १६ लाख झाला. स्कॉलरशीपसाठी या फंडाचे व्याज, ३२,००० वापरले होते. १९९५ मध्ये ते १ लाख १० हजारांपर्यंत गेले. तरीही विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ची मागणी वाढतच राहिली. १९९५ नंतरच्या कालखंडात स्पर्धा परीक्षा व इतर व्यावसायिक परीक्षांसाठी फंडामध्ये स्वतंत्र तरतूद केली गेली.[५४]

## विद्यार्थ्यांचे स्कॉलरशीप वाटप

प्रथमपासूनच स्कॉलरशीप वाटपासाठी सभेच्या चेअरमनच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांची कमिटी नमेली जाते. त्यामध्ये बोर्डिंगमधल्या विद्यार्थ्यांना जास्त लाभ मिळावा या उद्देशाने सर्व बोर्डिंगच्या व श्राविकाश्रमाच्या पदाधिकाऱ्यांना या कमिटीत दरवर्षी

बोलविले जाते. दरवर्षी विहित नमून्यात अर्ज मागवून त्याची वर्गवारी करून गरजू विद्यार्थ्यांना प्रथम स्कॉलरशीपचे वाटप केले जाते. अर्थात या स्कॉलरशीप देताना काही अटी द. भा. जैन सभेकडून घातल्या जातात. मेडिकल रिसर्च, इंजिनिअर व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी, मध, मांस व मद्य या तीन मकारांचा त्याग करावा लागतो. खेड्यातील विद्यार्थ्यांना मुद्दाम स्कॉलरशीपचा काही भाग राखून ठेवला जातो. धार्मिक परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते. डोनेशन देऊन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप दिल्या जात नाहीत. अनाथ आर्थिक दुर्बल कुटुंबातील मुलांना आर्थिक मदत देण्याचे धोरण १०० वर्षात पूर्वीप्रमाणेच समिती राबवते. मध्यवर्ती कमेटीचे निर्णय अंतिम असतात.[५५]

## स्कॉलरशीपची परतफेड व समस्या

द. भा. जैन सभेने ही स्कॉलरशीप शिक्षण घेण्यासाठी दिलेली असते. त्यामुळे गरजू विद्यार्थ्यांचे स्कॉलरशीपवर शिक्षण पूर्ण झाल्यावर ही रक्कम कोणत्याही प्रकारचे व्याज न देता द. भा. जैन सभेला परत करावी लागते. स्कॉलरशीप घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची नैतिक जबाबदारी असते. कारण हा पैसा पुन्हा गरजू विद्यार्थ्यांना वाटप केले जाते. परंतु प्रत्यक्षात मात्र परतफेडीचा अनुभव सभेला फारसा चांगला नाही. १९८२ पासून स्वतंत्र माणूस नेमून परतफेडीची रक्कम सभेने गोळा करण्यास सुरुवात केली. अर्थात स्कॉलरशीप परत न केल्यावर सभेने गॅरन्टीनुसार खरे तर कारवाई करणे योग्य होते. पण आजपर्यंत कोणावरही अशा प्रकारची कारवाई झालेली नाही. ज्यांनी स्वत:च्या शिक्षणासाठी समाजाचा पैसा दानरूपाने आलेला सभेचा पैसे त्यांनी सद्‌सद्‌विवेकबुद्धीने पैसा परत करावा ही सभेची अपेक्षा आहे.

## सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम

द. भारत जैन सभेची वस्तीगृहे ही विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा पुरविणारी वस्तीगृहे तर आहेतच पण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी या वस्तीगृहातून व्यक्तीमत्व

विकासासाठी प्रयत्न केले जातात, यासाठी विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कायक्रमातून संस्थेचे पदाधिकारी बोर्डिंगचे पदाधिकारी व विद्यार्थी भाग घेतात त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा, कलागुणांना वाव; आपण समाजासाठी काही देणे लागतो ही वृत्ती विकसित होणे विविध कार्यक्रमाच्या आयोजनातून प्रत्येक वस्तीगृह व श्राविकाश्रम सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबवते.

## १) सामाजिक कार्य

### १) पूरग्रस्तांना मदत

इ. स. १९५७ मध्ये संपूर्ण सांगली व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये भरपूर प्रमाणात अतिवृष्टी झाली. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यात पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली. तेव्हा कोल्हापूर व सांगली या वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी पूरपरिस्थितीची पाहणी केली व तेथील लोकांच्या मदतीला धावले. ज्या लोकांची घरे पूर्णपणे पाण्याभोवती वेढली गेली आहेत तेथे नावेच्या सहाय्याने जाऊन त्यांच्या घरातील जे मिळेल ते सामानासुमान व लोकांना सुरक्षित नावेमध्ये बसवून त्यांना नावेतून सुरक्षितस्थळी पोहोचवले जात असे. जितके लोक या पुरामध्ये सापडलेले होते तितक्या सर्व लोकांना वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी आपल्या जिवाची बाजी लावत त्यांचे प्राण वाचवले व वित्तहानी होण्यापासून देखील वाचवले. तसेच जे बेघर झालेले आहेत त्यांना धर्मशाळा किंवा सरकारी शाळेमध्ये त्यांचे पुनर्वसन केले; व त्यांना चहापान, कपडालत्ता, इत्यादी सर्व जीवनावश्यक गोष्टींची पूर्तता वस्तीगृह व्यवस्थापनामार्फत विद्यार्थ्यांकडून पुरवली जात असत.[५६]

जुलै/ऑगस्ट २००५ मध्ये देखील कोल्हापूर व सांगली येथे पुराने हाहाकार माजविला. यावेळेस नदीस पूर एक नव्हे दोन नव्हे तर तब्बल चारवेळा पूर परिस्थिती निर्माण जाली. संपूर्ण पाणी सांगली, कोल्हापूर व आजूबाजूच्या खेड्यामध्ये घुसले. सर्वसामान्य लोकांना काय करावे हे सुचेनासे झालेले होते. तेव्हा सर्व लोकांनी पुढाकार घेऊन एकदा

येऊन मदतीची याचना केली. तेव्हा यामधीलच एक घटक वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी एकजूट होऊन जेथे जेथे पूरपरिस्थिती निर्माण झालेली आहे तेथे तेथे जाऊन त्यांना प्रत्यक्ष त्यांना मदत करून त्यांना योग्य ते सुरक्षितस्थळी पोहोचविले जात. तसेच त्यांना कपडालत्ता, अन्न, पाण्याच्या सुविधादेखील योग्य व व्यवस्थितरीतीने केली गेलेली होती. जवळ जवळ १२ ते १५ दिवस नदीचा कर ओसरलेला नव्हता. तेव्हा या कालावधीत संपूर्णपणे मदतीचा ओघ वस्तीगृहातील विद्यार्थ्यांकडून चालू होता.[५७]

**२) राष्ट्रसेवा दलामार्फत वयोवृद्ध व आजारी व्यक्तीची सेवा करणे :**

प्रत्येक वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी-विद्यार्थिनींनी राष्ट्रसेवा दल नावाची संघटना स्थापन केली होती. या राष्ट्रसेवा दल संघटनेमार्फत गरीब गरजू व्यक्तीची मदत केली जात असे. एखाद्या वेळेस हॉस्पिटलमध्ये पेशंट जर फार आजारी असेल व त्याचे संबंधित नातेवाईक जर गैरहजर असतील तर वस्तीगृहातील विद्यार्थी त्या नातेवाईकाची जबाबदारी संपूर्णपणे योग्य रीतीने पार पाडली जात असे. तसेच त्याची संपूर्णपणे औषध वगैरे देऊन त्याची तळमळीने सेवा केली जात असे. तसेच वयोवृद्ध माणसांना बोटाला धरून घेऊन रस्ता पार करून देणे, तसेच अडथळ्याप्रसंगी सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहणे. तेव्हा त्यांची सेवा करण्याची धडपड व तळमळ यातून वस्तीगृह विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये घडविलेले संस्कार दिसून येतात.[५८]

**३) क्रांतीकारकांना आश्रय व मदत**

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता भारतातील अनेक क्रांतिकारक पुढे सरसावले परंतु त्यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर होता. कारण महाराष्ट्रामध्ये जणू काही 'क्रांती'चा जन्म झालेला आहे की काय असे वाटत होते.

१९४२ च्या चले जाव चळवळीतील क्रांतिकारक श्री. वसंतदादा पाटील, नागनाथआण्णा नायकवडी यांनी ब्रिटिशांविरुद्ध आवाज उठविला व घोषणा देत

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

बिटिशांच्याकडे स्वातंत्र्याची मागणी केली. त्यावेळेस ब्रिटिश सरकार गोळीबार करीत असे. तेव्हा सर्व क्रांतिकारक जिथे वाट मिळेल तिकडे पळत सुटे. तेव्हा यापैकी काही क्रांतिकारक हे वस्तीगृहामध्ये आश्रयासाठी येत असत. वस्तीगृहातील प्रत्येक विद्यार्थी त्यांची मदत करत होता. पोलिस येऊन चौकशी करत असत; परंतु वस्तीगृहातील विद्यार्थी एकजूट होऊन ते निर्भिडपणे पोलिसांना तोंड देत असत. त्यांना कुठल्याच गोष्टीचा थांगपत्ता लागू द्यायचा नाही. तसेच क्रांतिकारकांनी आणलेली शस्त्रास्त्रे व दारूगोळा यांची साठवणूक वस्तीगृहात केली जात असे व त्यांना योग्य त्या ठिकाणी ती शस्त्रास्त्रे पुरविली जात असे.[५९]

**४) रक्तदान :**

वर्षातून एकदा प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनी वस्तीगृहामध्ये रक्तदान शिबिर घेतले जाते यामध्ये कोणालाही रक्तदान करण्याविषयी सक्ती करण्यात येत नाही. ज्याची इच्छा असेल त्यांनीच रक्तदान करावे. तेव्हा वस्तीगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करत असत. तेव्हा हे दान केलेले रक्त ब्लड बँकेकडे पाठवले जात असे व योग्य त्या गरजू व्यक्तींना ते पुरवले जात असे. तेव्हा रक्तदान हेच सर्वश्रेष्ठदान अशा घोषणा विद्यार्थी देत असते.[६०]

**५) माजी विद्यार्थी मेळावे**

बोर्डिंगचा समाजाशी व समाजाचा बोर्डिंगशी ऋणानुबंध वृद्धींगत याकरिता बोर्डिंगतर्फे माजी विद्यार्थी मेळावे घेतले जात असत. तसेच या मेळाव्याद्वारे समाजातील घटनांचा व रुढीचा तसेच या मेळाव्याद्वारे समाजातील घटनांचा व रूढीचा तसेच बोर्डिंगसाठी काही नव्या योजना साकारता येतील काय? या नव्या योजना साकारण्यामध्ये माजी विद्यार्थ्यांचा कितपत सहभाग करावयाचा; तसेच त्याच्याकडून बोर्डिंगच्या विकासासाठी त्याच्याकडे आर्थिक सहयोगाची विनंती केली. माजी विद्यार्थ्यांनी आर्थिक मदत भरपूर प्रमाणात केली. माजी विद्यार्थ्यांच्या या माध्यमातून बोर्डिंगला चांगला आर्थिक सहयोग प्राप्त

झाला आहे. माजी विद्यार्थी मेळावे प्रत्येक व्यक्तीचे बोर्डिंगमार्फत वैयक्तिक सत्कार केला जात असे.[६१]

### ६) वधु-वर मेळावा

वधु-वर परीक्षण व निवड करणे आजच्या महागाईच्या काळात सुकर व्हावे, बोर्डिंगचा समाजाशी व समाजाचा बोर्डिंगशी ऋणानुबंध वृद्धींगत व्हावा याकरिता बोर्डिंग आवारात वधु-वर मेळाव्याचे आयोजन केले जाते.[६२] त्यामुळे सर्व दिगंबर पंथीयांना बोर्डिंगमध्ये एकत्र येणे व निर्णय घेणे एकदम सोईस्कर सोपे होते. म्हणून वधु-वर मेळावे भरले जाण्यास प्रोत्साहन दिले जाऊ लागले.[६३]

### ७) आरोग्य विषयक सुविधा :

उत्तम शरीरात उत्तम मनाचा निवास असतो म्हणून दरवर्षी वैद्यकीय तपासणी शिबिर घेऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्याची संपूर्ण तपासणी केली जाते. ६४ तसेच श्राविकाश्रमामध्ये देखील वर्षातून सहा सहा महिन्यातून एकदा म्हणजे दोनदा वार्षिक तपासणी केली जाते की जेणेकरून त्याचे आरोग्य स्वास्थ्य व्यवस्थितपणे टिकवले जात असे. त्यामुळे विद्यार्थी-विद्यार्थिनीचे आरोग्य चांगले जोपासले जात असे.[६५]

## वीरसेवा दलाची स्थापना :

दक्षिण भारत जैन सभेतर्फे दि. ९/१२/१८७९ ते दि. ९/१२/१९७९ हे वर्ष सभेचे थोर शिल्पकार स्व. श्री. आण्णासाहेब लठ्ठे यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून मोठ्या प्रमाणात साजरे करण्यात आले आणि या वर्षाच्या विविध विधायक उपक्रमाचा एक स्थायी स्वरूपाचा भाग म्हणून 'वीर सेवा दल' या सभेच्या नवीन युवक संघटनेची व नवीन शाखेची दि. २६/१/१९७९ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभदिवशी दावणगिरी येथे भरलेल्या सभेच्या ६५ व्या अधिवेशनामध्ये मुहूर्तमेढ रोवण्यात आली. सभेचे प्रमुख संस्थापक व प्रभावी मार्गदर्शन स्व. श्री. आण्णासाहेब लठ्ठे यांची स्मृती चिरंतन रहावी त्याच्या सारखे

निस्वार्थी व सामाजिक ऋणांची जाणीव असणारे नेते व कार्यकर्ते यांची परंपरा समाजात अखंडितपणे चालू रहावी, आणि भगवान महाविरांच्या 'जगा व जगू द्या' या अहिंसक तत्वज्ञानावर अधिष्ठित झालेल्या विविध सेवा योजनांच्या आणि उपयुक्त उपक्रमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून युवक युवतींवर आवश्यक ते संस्कार करून त्यांना आदर्श नागरिक बनविण्याची प्रक्रिया समाजात अव्याहतपणे टिकून रहावी या मुलभूत उद्देशाच्या पूर्तीसाठी 'वीर सेवा दल' नावाची भरीव स्वरूपाची युवक संघटना सभेने स्थापन करावी असा आशयाचा धनंजय गुंडे यांनी मांडलेला व डॉ. एन. जे. पाटील यांनी अनुमोदन दिलेल्या क्रांतिकारी प्रस्ताव दावणगिरीच्या अधिवेशनात अत्यंत उत्साहाच्या वातावरणात पास करण्यात अ-ाला. साहजिकच 'वीर सेवा दल' या युवक युवतींना धर्माचरणाबरोबर सामाजिक व राष्ट्रीय जीवनात सक्रिय सहभागी करून घेण्याची स्वयंसेवक संघटनेच्या स्थापनेमुळे द. भा. जैन सभेच्या ऐंशी वर्षावरील इतिहासामध्ये एका नवीन पर्वास सुरुवात झाली.

अर्थात वीर सेवा दल संघटनेची ही सुरुवात अकस्मात झाली नाही तर दक्षिण भारत जैन सभेने सुमारे ६० वर्षापासून सातत्याने पुरस्कार केलेल्या आणि विविध अवस्थामधून गेलेल्या युवकाच्या चळवळीतून निर्माण झालेल्या संघटित प्रयत्नांचे वीर सेवा दल हे परिणाम स्वरूप आहे. तेव्हा आजचे वीर सेवा दल म्हणजे सभेने आजवर निष्ठापूर्वक जोपासलेल्या युवाशक्तीचा जो प्रगल्भ अविष्कार आहे या अविष्काराला विस्तृत घटनेच्या रूपाने स्थायी संरचना देण्यात आली आणि या घटनेला सभेच्या शाखांमध्ये अधिकृतपणे समाविष्ट केल्याने विशिष्ट दर्जा व मान्यता प्राप्त झाली. म्हणून वीर सेवा दल कायअरत झाल्यापासून दक्षिण भारत जैन सभेच्या इतिहासामध्ये सुसंघटित, विधायक व सार्वजनिक स्वरूपाच्या सेवा प्रकल्पाचा व कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.[६६]

आपल्या अध्यक्षीय भाषणात विलास संगवे यांनी हे वीर सेवा दल आहे. सेना दल नाही. सेवा म्हणजे त्याग व त्याग म्हणजे आनंद यांचे बिजारोपण यामुळे तरुण तरुणी मध्ये होणार आहे. आजचा दिवस दक्षिण भारत जैन सभेच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल असे प्रतिपादन केले. या सेवादलाचे मुख्य प्रवर्तक डॉ. धनंजय गुंडे सारखी अनुभवी व तळमळीचे तरुणात लोकप्रिय असलेली व्यक्ती असल्यामुळे या वीर सेवा दलाने लावलेल्या रोपट्याचे रूपांतर मोठ्या वृक्षामध्ये नक्कीच होईल व थोड्याच दिवसांत अपेक्षेप्रमाणे कर्नाटक, महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात त्यांच्या शाखा सुरू होतील अशी ग्वाही दिली.[६७]

**वृक्षारोपण :**

आज सर्वत्र जंगलतोड प्रचंड प्रमाणात सुरू आहे. सह्याद्रीसारख्या वनसृष्टीचे ओसाड प्रदेशात रूपांतर होत आहे. यामुळे अनावृष्टी व वायूदूषण यासारख्या गंभीर संकटांना आपणास तोंड द्यावे लागत आहे. जंगल तोडीमुळे पावसाचे प्रमाण घटत चालले आहे व पावसावर अवलंबून असलेले अन्नधान्य उत्पादन घटत आहे. वायू प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम होत आहे. यासाठी शासनाने वृक्षारोपण हा राष्ट्रीय कार्यक्रम समजून सर्व ठिकाणी सामाजिक वनीकरण वृक्ष संवर्धन यासारखे कार्यक्रम राबविले जात आहेत.

वीर सेवा दलाने या वर्षापासून वृक्षारोपण व राष्ट्रीय कार्यक्रम हाती घेतला आहे व पहिल्याच वर्षी कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळे वृक्षारोपण मोहिमेत आम्हास अपेक्षेपेक्षा चांगले यश लाभले आहे.[६८] तसेच गावोगावी प्रचार दौरे काढून वृक्षारोपपनाचे महत्व वस्तीगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनी सामान्य लोकांना पटवून देत असे.[६९] वृक्षारोपनामुळे वातावरणामध्ये कसे बदल घडवून येतात. या गोष्टी साध्य होत असे. तसेच वृक्षारोपनामुळे पर्यावरणातील वातावरणात समतोल राखला जात असे. तसेच वृक्षारोपणाचे महत्व पटवून देण्यासाठी गावोगावी प्रचार दौरे काढून रॅली काढून गावोगावी 'झाडे लावा झाडे जगवा' अशा घोषणा देत संपूर्ण गावोगावी वृक्षारोपनाचे महत्व पटवून सांगितले.[७०]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## व्यसनमुक्ती 'फेरी'

तरुणांची जवळीकता समाजाशी व धर्माशी हवी की जिथे त्यांचा सर्वांग विकास आहे त्यापासून दूर जात आहे. युवकाचा ज्यात शारीरिक, मानसिक व बौद्धीक ऱ्हास आहे अशा व्यसनाशी त्याने जवळीकता साधली आहे. व्यसने म्हणजे आजच्या युगात मानवजातीला लागलेला कॅन्सर आहे. तरुणपिढी या व्यवसनात गुरफटून गेलेली आहे. तंबाखू, बिडी, सिगारेट, चिलीम, चिऊट ओढणे इ. व्यससनाने तो कॅन्सर, कर्करोग, रक्तदाब, भूक मंदावणे इ. विकारांना आमंत्रण देतो आहे. दारू व आमली पदार्थांच्या सेवनाने स्वत:च्या आरोग्याची हानी, मानसिक दुर्बलता, जठराचे रोग, हृदयरोग, वृद्धीभ्रम होण्यास मदत करतो आहे. तरुणांच्या अशा व्यसनामुळे वाया जाणाऱ्या युवाशक्तीचे रक्षण व्हावे. प्राचीन काळात व्यसने हुंबराच्या फुलासारखी होती. पण आधुनिक काळात ती फॅशन बनली आहे.

याकरिता वीर सेवा दलाने इतिहासात हाती कोणी घेतला नाही असा ऐतिहासिक उपक्रम हाती घेतला तो म्हणजे 'व्यसनमुक्ती व निसर्गापासून दूर जाणाऱ्या समाजामध्ये वृक्षाविषयी स्नेहसंस्कार निर्माण करणारी वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन जनजागरण रॅली' यासाठी उत्स्फूर्तपणे तीन हजार वीर सैनिक स्वत: मुक्त होऊन (कारण स्वत: व्यसनमुक्त झाल्याशिवाय दुसऱ्याला सांगण्याचा नैतिक अधिकार पोहचत नाही.) पवित्र ठिकाणी कुंजवन येथे पवित्र मनाने पवित्र दिंडीची सुरुवात २३ जाने. १९८३ रोजी झाली. त्यानंतर खेडोपाडी व्यसनमुक्तीची प्रचार दौरे व फेऱ्या काढल्या."[७१]

समाज व्यसन मुक्त व्हावा म्हणून जनजागरणाच्या उद्देशाने दिंड्या काढल्या जातात. त्यावेळी स्वत: व्यसनरहित होण्याची सिद्धी करून भव्य मिरवणुकीने मैलोमैली वाटचाल करून घोषणा देत पण कोणालाही आपल्या उपस्थितीचा किंचीतही त्रास न देता आपल्या निर्वैर निर्मळ प्रसन्न सेवेने त्यांचा मनोपरिणाम शुभप्रवृत्त करण्याकडे त्यांचा प्रयत्न असतो.

विविध धर्मक्षेत्रात पायी अथवा सायकलीने जे समूहाने प्रवासास जात. वाटेतील गावातील लोकांशी संपर्क साधत साधत जनजागरण ते करतात.[७२]

२२ मे १९८३ ला कुंगवन ते बाहुबली व्यसनमुक्ती, वृक्षारोपण व जनजागरण पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव, विजापूर, जमखंडी या भागातील हजारो सैनिक व इतर जनसमूदाय व्यसनमुक्त होऊन या पदयात्रेत सामील झालेला होता. महाराजांनी व्यसनाचे दुष्परिणाम सर्वांना अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगितले.

डॉ. धनंजय गुंडे यांनी पदयात्रेची पार्श्वभूमी सांगितली. डॉ. म्हणाले, युवकांवर केवळ टीका करू नका तर त्यांना मार्गदर्शन करा. यासाठी सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. ना. आवाडे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'काही लोक दारिद्र्याचे दुःख विसरण्यासाठी दारू पितात तर काही फॅशन म्हणून दारू पितात. सुधारणेच्या नावाखाली लोक व्यसनाधिन बनत आहेत. न्या. नेवगीसाहेबांनी आपल्या न्यायदानाच्या काळात दारूचे खटले कशा प्रकारचे होते व असतात याची सविस्तर माहिती दिली.

छोड दो छोड दो दारू पिना छोड दो
छोड दो छोड दो मास खाना छोड दो
सोडा सोडा व्यसने सोडा
लावा लावा झाडे लावा!

अशा घोषणा देत, उन्हातान्हात दुसऱ्यांना व्यसनमुक्तीचे आवाहन करीत होते. त्यामुळे कोल्हापुरात प्रचंड जनजागृती झाली.[७३]

## सांस्कृतिक कार्यक्रम

### १) पर्युषण पर्व :

पर्युषण पर्व हा समारंभ जैन समाज, विद्यार्थी यांना पुण्य व ज्ञान संपन्न करण्याची महान पर्वणीच असते. बऱ्याच वर्षापासून हा समारंभ मोठ्या उत्साहाने व वैभवाने साजरा करण्याची परिपाटी पडलेली आहे. या पर्वाचे वेळी महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अनेक विद्वानांना व्याख्यानाकरिता निमंत्रित करण्यात येते व निरनिराळ्या विषयावर व्याख्याने आयोजित केली जातात. या व्याख्यान सभेस कोल्हापुरातील विद्यार्थी समाज व इतर चाहते श्रोते हजारोंनी नेहमीच उपस्थित राहतात.[७४]

### २) महावीर जयंती, विजया दशमी :

महावीर जयंती व विजया दशमी दसरा हे मोठे सण मोठ्या उत्साहाने एकत्रितपणे येऊन साजरा करतात. ७५ तसेच या दसरा व महावीर जयंती उत्सवामध्ये कोल्हापुरातील बहुसंख्य जैन समाज बोर्डिंग प्रांगणात एकत्र येऊन व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांशी एकरूप होऊन हे सण उत्साहाने व हर्षाने व आनंदीत मनाने साजरा करतात.[७६]

### ३) वार्षिक मनोरंजन कार्यक्रम :

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी बोर्डिंगतर्फे वार्षिक मनोरंजनाचा कार्यक्रम घेतला जात असे यामध्ये स्वत: विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होऊन, त्यामध्ये गायन स्पर्धा, रांगोळी स्पधा, मेहंदीच्या स्पर्धा तसेच इतर अनेक मनोरंजन कार्यक्रम वस्तीगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनी घेऊन वार्षिक मनोरंजनाचा कार्यक्रम पार पाडत असत.[७७]

### ४) व्याख्याने :

विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकास व्हावा या दृष्टीकोनातून नामवंत तज्ज्ञांना व्याख्यानासाठी ।चारण केले जात असे व त्याचा ठसा विद्यार्थ्यांच्यावर घडविला जात असे. ७८ तसेच विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कलेचा विकास व्हावा या करिता 'कर्मवीर भाऊराव पाटील'

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KO...

यांच्या जयंतीदिनी व शांत तथा तात्या पाटणे यांच्या पुण्य तिथीनिमित्त आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दरवर्षी केले जाते. ७९ व्याख्याने आयोजित करणे व वक्तृत्व स्पर्धा ही प्रत्येक वस्तीगृहामध्ये घेतल्या जात असत.[८०]

**५) विद्यार्थ्यांना कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेणे**

एखाद्या कार्यक्रमाप्रसंगी म्हणजेच वार्षिक क्रीडा स्पर्धा वेळेस व वार्षिक मनोरंजन, वक्तृत्व स्पर्धा माजी विद्यार्थी मेळावे, वधु-वर मेळावा या कार्यक्रमाप्रसंगी आम्ही जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतो; याचे कारण म्हणजे असे केल्यामुळे विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या अंगी बोलण्याचे धाडस व स्वतःबद्दल मनामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. याच्यामुळे याचा फायदा विद्यार्थ्यांना भविष्यकाळात होतो. तेव्हा ते आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहण्यास खंबीर होतात.[८१]

**६) वार्षिक क्रीडा स्पर्धा व क्रीडाविषयक सुविधा :**

या सांस्कृतिक कार्यक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या शारीरिक स्वास्थ्याकडे पूर्ण लक्ष देण्यात आले आहे व त्याकरिता सुरुवातीपासून चालकांनी योजना केली आहे. सुरुवातीस कवठे येथील श्री. आर. ए. खाडे यांनी एक तालीमखाना सुरुवातीस बांधला. त्याचा लाभ विद्यार्थी घेत आहेत. याशिवाय व्हॉलीबॉल, क्रिकेट, रिंगटेनिस, तसेच इतर देशी व विदेशी आणि सांघीक व वैयक्तिक खेळ खेळण्याची सोय करण्यात आली आहे. त्याचा लाभ विद्यार्थी घेत आहेत. वर्षातून एकदा विद्यार्थ्यांच्या चढाओढी घेतल्या जातात व वरील क्रमांकाच्या खेळाडूंना उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जातात.[८२]

मा. तात्या पाटणे यांच्या प्रोत्साहनामुळे जैन बोर्डिंगमध्ये बॉडी बिल्डर्ससाठी अद्ययावत व्यायामशाळा सुरू झाली. तिचा लाभ अनेक खेळाडूंनी घेतला. त्यापैकी अनेकांना वेगवेगळ्या संस्थामध्ये शिक्षक म्हणून नोकऱ्याही लागल्या.[८३]

अभ्यासातून विरंगुळा मिळावा यासाठी कॅरम, बुद्धिबळ, रिंग, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस यासारख्या खेळांची साधने विद्यार्थी-विद्यार्थिनींना उपलब्ध करून दिली जातात.[८४]

**स्पर्धा परीक्षा व्यवसाय मार्गदर्शन :**

आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये सर्वसामान्य विद्यार्थ्याला त्याच्या गुणवत्तेमध्ये अधिकाधिक सुधारणा करणे गरजेचे आहे. तसेच येथून पुढे विद्यार्थ्यांना वस्तीगृहात प्रवेश देताना त्याच्या गुणवत्तेवरून प्रवेश दिला जाईल. तसेच स्पर्धात्मक परीक्षेची तयारी करण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींना वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके उपलब्ध करून दिलेली आहेत. तसेच स्पर्धात्मक परीक्षेमध्ये ज्यांनी यश संपादन केले आहे अशा व्यक्तींना बोलावून त्यांच्याकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. तसेच विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. ८५ तसेच १२ वीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाच्या परीक्षेत अधिकाधिक गुण प्राप्त करावेत याकरिता विवेकानंद कॉलेजच्या सहकार्यातून दरवर्षी विशेष मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले जाते.[८६]

**स्नेहसंमेलन :**

विद्यार्थ्यांना सामूदायिक जीवनाची योग्य महती समजावून देण्याकरिता वर्षाअखेरीस 'स्नेहसंमेलन' साजरे केले जाते. यावेळेस एखाद्या विद्वान व्यक्तीस व्याख्याता म्हणून पाचारण केले जाते व त्यावेळेस खेळात प्राविण्य मिळविलेल्या व धार्मिक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे त्याच्या हस्ते दिली जातात. तसेच विद्यार्थ्यांचे मनोरंजनाचे कार्यक्रम होतात. अशा कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन दिले जाते.

याशिवाय 'विद्यार्थी हस्तलिखिताचे' पुष्प प्रत्येकवर्षी गुंफले जाते. या हस्तलिखितात विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व त्यांच्या लेखनशैलीला वाव देण्यात येतो व त्याच्या कथा, निबंध, कविता वगैरे रचना प्रकाशित केल्या जातात.[८७]

**आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा :**

विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणाचा विकास व्हावा त्यांच्या व्यक्तीमत्व विकासाला चालना मिळण्यासाठी आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन बोर्डिंग व्यवस्थापनामार्फत वस्तीगृहामध्ये आयोजन केले जाते. या वक्तृत्व स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील स्पर्धकांनी यामध्ये सहभाग घेतलेला होता. तसेच वस्तीगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनीदेखील या वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभागी होत असत व आपली चमक दाखवून जास्त बक्षिसे मिळवत असत.[८८]

**स्लाईड शो दाखवणे :**

वस्तीगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्या कलात्मक गुणांचा विकास व्हावा व त्यांची बुद्धीमत्ता परिपक्व व्हावी या हेतूने वस्तीगृहामध्ये स्लाईड शोचा कार्यक्रम घेतला जातो. स्लाईड शो प्रोजेक्टरच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना दाखविला जातो. या स्लाईड शोमध्ये काही अभ्यासासंदर्भातील फिल्मस् तसेच भगवान महावीरांच्या जीवनातील प्रसंग, काही मनोरंजक गोष्टी व आजचा युवक ज्या गोष्टीला बळी पडत आहे तो महाभयंकर रोग 'एड्स' या संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती दिली जाते. हे दाखविल्यामुळे विद्यार्थ्यांची संप्रेषण शक्ती वाढते व त्यांना कोणत्याही गोष्टीचे आकलन करण्यास सोपे जाते व निर्णय योग्य घेणे सोपे जाते.[८९]

महिलाश्रमातील कार्यक्रम :

स्त्रियांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध प्रकारचे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम सर्व श्राविकाश्रमातून राबविले जातात. त्यामध्ये पर्युषणपर्व महावीर जयंती, अनंत चतुर्थदर्शी, नागपंचमी, कोजागिरी पौर्णिमा, हळदी-कुंकू, तिळगूळ वाटप आणि इतरही कार्यक्रम पार पाडले जातात. वेगवेगळ्या कार्यक्रमामध्ये आरोग्य शिबीराचे नियोजन केले जाते. त्यामध्ये रक्त गट तपासणे, वेगवेळ्या लसी देणे स्त्री आरोग्य तज्ञांची भाषणे आयोजित

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

करणे. एड्स विषयावर चर्चासत्र घेणे इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. महिला मेळावे, महिला उद्योजकता, शिबीरे आयोजित केली जातात. वधू-वर मेळाव्याच्या नियोजनामध्ये विद्यार्थीनी व महिलाश्रमातील पदाधिकारी महत्त्वाची जबाबदारी उचलतात. स्नेहसंमेलन व खेळ स्पर्धा आयोजित करून विजेत्या मुलींना बक्षिस देण्यात येतात. खेळासाठी हॉलीबॉल, रींग इक्ष्यादी साहित्य पुरविले जाते. लघूउद्योग केंद्र व व्यावसायिक शिक्षण केंद्र सुरू करून या महिलाश्रमांनी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वत:च्या पायावर मुलींनी उभे रहावे यासाठी प्रयत्न केले आहेत.

## संदर्भ साधने

१) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास (१९७६-२०००), पृ.३८८-८९
२) द. भा. जैन सभेचा अहवाल, १९९५
३) द. भा. जैन सभेची दुरुस्तीसह सुधारित घटना, १९९८, पृ. १
४) श्री. महेश उपाध्ये यांची मुलाखत, ३/१२/२००५ (दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर)
५) कित्ता
६) द. भा. जैन सभा बोर्डिंगच्या ऑफिसमधील सुपरिटेंडेंटची लिस्ट, दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूर, २००५-०६.
७) लठ्ठे अ. बा. मेमॉयर्स ऑफ हिज हायनेस, छ. शाहू महाराज ऑफ कोल्हापूर, टाईम्स ऑफ इंडिया, १९२४, पृ. ३९७
८) डॉ. संघवे, द. भा. जैन सभेचा इतिहास, पृ. ९५
९) कित्ता, पृ. ९५
१०) श्री. महेश उपाध्ये यांची मुलाखत, ३/१२/२००५
श्री. आप्पासाहेब गाझी यांची मुलाखत १/१२/२००५ (सेक्रेटरी सांगली बोर्डिंग)
११) सतीश आरवाडे यांची मुलाखत, ७/१२/२००५ (सुप. सांगली)
१२) प्रगती आणि जिनविजय, ५/८/१९६०
१३) दिगंबर जैन विद्यालय उपरोक्त, पृ. ८
१४) प्रगती आणि जिनविजय, १ नोव्हेंबर १९६२
१५) कमवा व शिका या योजनेमधील विद्यार्थी व विद्यार्थिनींची मुलाखत, ३०/३/२००६
१६) मुलाखती
१) गाझी सर,
२) श्री. कुसनाळे, ११/३/२००६ (सेक्रेटरी बेळगाव बोर्डिंग)
३) श्री. नागराळे १२/३/२००६; वस्तीगृहातील विद्यार्थ्यांची मुलाखत, ३०/३/२००६
१७) श्री. धनपाल हेरवाडे मामा यांची मुलाखत, १/१२/२००५
श्री. संजय कुचनुरे यांची मुलाखत, २०/३/२००६ (वॉर्डन बेळगाव बोर्डिंग)

१८) श्री. शामकांत पाटील यांची मुलाखत, १०/१२/२००५ (कोल्हापूर बोर्डींग माजी सुपरिटेंडेंट)

१९) डॉ. सौ. पद्मजा पाटील, लठ्ठेंची कोल्हापुरातील कारकीर्द, अप्रकाशित एम. फिल. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, १९८४, कोल्हापूर, पृ. ५६

२०) साप्ताहिक सत्यवादी, १४/१/१९३४, पृ. ४

२१) श्री. शांतीनाथ तवन्नाप्पा पाटणे गौरव अंक, प्रकाशन दि. जै. बो. दसरा चौक, कोल्हापूर, १९८८, पृ. ११

२२) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृ. १५४,१५५

२३) प्रगती आणि जिनविजय (वार्षिक पत्रिका, १९९३, कन्नड)

२४) अहिंसा स्मरण पत्रिका, प्रकाशन, दि. जै. बो. हुबळी, १८/३/२००१, पृ. ३१ (कन्नड)

२५) डॉ. संगवे, उपरोक्त, पृ. १५९

२६) कित्ता, पृ. १६०,१६१

२७) ए शॉर्ट रिपोर्ट ऑफ माणिकबाग दिगंबर जैन बोर्डींग बेळगाव, २/६/२००१, पृ. १ (इंग्रजी)

२८) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृ. १६४, १६५

२९) प्रगती आणि जिनविजय, ५/७/१९८२, पृ. २

३०) धर्मविजय, शतकमहोत्सवी स्मरणपत्रिका, १०/१०/२००३, पृ. ५५ (कन्नड)

३१) ए शॉर्ट रिपोर्ट ऑफ माणिकबाग दिगंबर जैन बोर्डींग बेळगाव, २/६/२००१ पृ. २

३२) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृ. १७२ ते १७४

३३) प्रगती आणि जिनविजय, ५/७/१९८२, पृ. ७

३४) शांतीनाथ तवन्नाप्पा पाटणे गौरव अंक, प्रकाशन, दि.जै.बो. दसरा चौक, कोल्हापूर, १९८८, पृ. २९,३०

३५) श्री. बाहुबली नेमीनाथ खोत यांची मुलाखत, १/१२/२००५

३६) श्री. आप्पासाहेब गाझी यांची मुलाखत, १/१२/२००५
श्री. सतीश आरवाडे यांची मुलाखत, ८/१२/२००५

३७) प्रगती आणि जिनविजय, १४/३/१९८८, पृ. ३

३८) प्रगती आणि जिनविजय, ५/७/१९८२, पृ. २

३९) विलास संगवे, उपरोक्त, पृ. २०४ ते २०६

४०) श्री. सरोजनी श्रीपाल इंचलकरंजे यांची मुलाखत, ४/१२/२००५ (सेक्रेटरी सांगली श्राविकाश्रम)

सौ. अर्चना वसंत मिणचे, ४/१२/२००५ (सुप. सांगली श्राविकाश्रम)

४१) सौ. सुमन बाळासाहेब चौधरी याची मुलाखत, ४/१२/२००५ (चेअरमन सांगली श्राविकाश्रम)

४२) साप्ता. सत्यवादी, २८/३/१९३४, पृ.५

४३) दिगंबर जैन विद्यालय, उपरोक्त, पृ. १०, ११

४४) प्रगती आणि जिनविजय, ३/५/१९८२, पृ. ४

४५) दिगंबर जैन विद्यालय, उपरोक्त, पृ. ३५

४६) हुबळी जैन बोर्डिंगचे वज्र महोत्सवी अधिवेशन, १२/११/१९७९, पृ. २५, २६

४७) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृ. १५५,१५६

४८) कित्ता, पृ. २१४ ते २१६

४९) दिगंबर जैन विद्यालय, उपरोक्त, पृ. ११

५०) प्रगती आणि जिनविजय, १९९३, पृ. २४,२५ (कन्नड)

५१) डॉ. पद्मजा पाटील, द. भा. जैन सभा (१९७६-२०००), पृ.

५२) डॉ. संघवे, उपरोक्त, पृ. २१४ ते २२१; १९२० ते १९७० सालातील द. भा. जैन सभेचे वार्षिक अहवाल, सांगली

५३) डॉ. पद्मजा पाटील, द. भा. जैन सभा (१९७६-२०००) पृ.

५४) द. भा. जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९९५

५५) श्री. धनपाल हेरवाडे मामा यांची मुलाखत, १/१२/२००५ (महामंत्री द. भा. जैन सभा)

५६) कित्ता,

५७) श्री. आप्पासाहेब गाझी यांची मुलाखत, १/१२/२००५

श्री. महेश उपाध्ये यांची मुलाखत, ३/१२/२००५

५८) श्री. धनपाल हेरवाडे मामा यांची मुलाखत, १/१२/२००५


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

५९) कित्ता
६०) श्री. आप्पासाहेब गाझी यांची मुलाखत, १/१२/२००५
६१) श्री. सतीश आरवाडे यांची मुलाखत, ८/१२/२००५
६२) दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर शताब्दीपूर्ती महोत्सव (१९०५-२००५), प्रकाशन दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूर इ. स. २००५, पृ. ४
६३) श्री. श्यामकांत पाटील यांची मुलाखत, ३/१२/२००५
६४) दि. जै. बो. कोल्हापूर शताब्दीपूर्ती महोत्सव (१९०५-२००५), प्रकाशन दि. जै. बो. कोल्हापूर इ. स. २००५, पृ. ३
६५) दिगंबर जैन विद्यालय, उपरोक्त, पृ. १३
सौ. रत्नप्रभा दुग्गे यांची मुलाखत, ३/१२/२००५ (सेक्रेटरी कोल्हापूर महिलाश्रम)
६६) डॉ. विलास संगवे, वीर सेवा दल, नवीन पर्वाची सुरुवात, वीर सेवा दलाची स्थापना, प्रकाशन, रा. ध. दावडा दिगंबर जैन बोर्डिंग, सांगली, १९८६, पृ. ३६
६७) प्रगती आणि जिनविजय, १२/२/१९७९, पृ. २
६८) प्रा. सुरेंद्र वाळवेकर, वृक्षारोपण, वीर सेवा दल विशेषांक, १९८३, पृ. ५१
६९) श्री. आप्पासाहेब गाझी यांची मुलाखत, ३/१२/२००५
७०) श्री. महेश उपाध्ये यांची मुलाखत, ३/१२/२००५
७१) प्रगती आणि जिनविजय, १४/६/१९८३, पृ. ५,६
७२) प्रगती आणि जिनविजय, १४/६/१९८६, पृ. ३
७३) प्रगती आणि जिनविजय, १४/६/१९६०, पृ. ६,७
७४) दिगंबर जैन विद्यालय, उपरोक्त, पृ. १२
७५) सौ. सुमन बाळासाहेब चौधरी याची मुलाखत, ४/१२/२००५ (चेअरमन सांगली श्राविकाश्रम)
७६) शताब्दीपूर्ती महोत्सव, दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर, २००५, पृ. ४
७७) सौ. रत्नप्रभा दुग्गे यांची मुलाखत, ३/१२/२००५
सौ. दीप्ती चौधरी यांची मुलाखत, ३/१२/२००५, श्री. महेश उपाध्ये यांची मुलाखत, ३/१२/२००५
७८) आप्पासाहेब गाझी यांची मुलाखत, १/१२/२००५

७९) शताब्दीपूर्ती महोत्सव, दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर, २००५, पृ. ३

८०) श्री. सरोजनी श्रीपाल इंचलकरंजे यांची मुलाखत, ४/१२/२००५ (सेक्रेटरी सांगली श्राविकाश्रम)

८१) श्री. महेश उपाध्ये यांची मुलाखत, ३/१२/२००५
श्री. सतीश आरवाडे यांची मुलाखत, ८/१२/२००५
सौ. सुमन चौधरी यांची मुलाखत, ४/१२/२००५
सौ. अर्चना मिणचे यांची मुलाखत, २/१२/२००५

८२) दिगंबर जैन विद्यालय, उपरोक्त, पृ. १३

८३) श्री. शांतीनाथ तवन्नाप्पा पाटणे गौरव अंक, दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूर, पृ. ५६

८४) शताब्दीपूर्ती महोत्सव, दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर, २००५, पृ. २

८५) आप्पासाहेब गाझी यांची मुलाखत, १/१२/२००५
सौ. सुमन चौधरी यांची मुलाखत, ४/१२/२००५
सौ. रत्नप्रभा दुग्गे यांची मुलाखत, ३/१२/२००५

८६) शताब्दीपूर्ती महोत्सव, दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर, २००५, पृ. ३

८७) दिगंबर जैन विद्यालय, उपरोक्त, पृ. १३

८८) श्री. आप्पासाहेब पाटील यांची मुलाखत, १/१२/२००५
श्री.सतीश आरवाडे यांची मुलाखत, ८/१२/२००५
श्री. महेश उपाध्ये यांची मुलाखत, ८/१२/२००५

८९) सौ. रत्नप्रभा दुग्गे यांची मुलाखत, ३/१२/२००५
सौ. सरोजनी इंचलकरंजे यांची मुलाखत, २/१२/२००५
श्री. महेश उपाध्ये यांची मुलाखत, ३/१२/२००५
सौ. दीप्ती चौधरी यांची मुलाखत ३/१२/२००५